# निर्धार

## वार्षिकांक

सत्र २०१८-२०१९

बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade 'B' (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru



# Our Inspiration



**Hon'ble**
**Late Shri Bhausaheb Mulak**
Ex. Minister, Maharashtra State
Ex. Mayor-NMC, Founder Chairman,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpur



**Hon'ble**
**Smt. Sumanmala B. Mulak**
Chairperson,
Backward Class Youth Relief Committee, &
Bhausaheb Mulak Charitable Trust, Nagpu

## Founder's Message

This is an age of modern science and technology and we are in the 21st century. India is growing economically and technologically and will join the list of 'Developed Nations by year 2020'. This growth is not possible without sound support of technical human resource. We at our college aim at overall development of the personality of an individual by providing best education, technical know how, personality traits and leadership qualities to grow as a manager & a technocrat.

# The Leader



**Hon'ble**
**Shri Rajendra B. Mulak**
Ex. Minister of State (Govt. of Maharashtra)
Finance & Planning, Energy, Water Resourses,
Parliamentary, Affairs & Excise
Hon. Secretary, BCYRC and BMCT




**Hon'ble**
**Smt. Prerna R. Mulak**
Managing Director,
B.C.Y.R.C. & B.M.C.T.,
Nagpur

## An introduction to BCYRC

Backward Class Youth Relief Committee was founded in 1974 with the primary objective of upliftment of students belonging to Backward Class and Rural Areas. Founded by Late Shri Bhausaheb Mulak, Ex. Minister, Government of Maharashtra, Ex-Mayor of Nagpur Municipal Corporation and a man with vast experience and vision. This organization has grown by leaps and bounds. Shri Rajendra Mulak, Minister of State (Government of Maharashtra) and the Secretary of BCYRC, is an enterprising, dynamic and innovative personality. He is the catalytic force behind the progress of the organization and is a set example of leadership.



**Hon'ble Yashraj R. Mulak**
Treasurer, BCYRC & BMCT, Nagpur



**Shri D. K. Mahadik**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Mrs. Padmaja Shyam Dandge Patil**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Shri Padmakar Agrawal**
Member of
Local Management
Committee
Bhiwapur Mahavidyalaya,
Bhiwapur



**Dr. Jobi George**
Principal
Bhiwapur
Mahavidyalaya,
Bhiwapur

# महाविद्यालयाविषयी थोडेसे..........

आमच्या सर्व संस्थेचे संस्थापक, प्रवर्तक व आधारस्तंभ शिक्षणमहर्षी माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक आहेत. मा. भाऊसाहेबांनी ग्रामीण भागातील जनतेचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय जीवन जवळून तर बघितलेच पण त्या जीवनाचा त्यांनी स्वतः अनुभव घेतला. त्यांचे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण व नागरी जीवनाचे एक सुसंगत एकजिनसी आणि रसाळ मिश्रण होय. मा. भाऊसाहेबांनी मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सर्वांगीण उत्थानाकरिता सन १९७४ मध्ये 'बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटी' ह्या संस्थेची नागपूर येथे स्थापना केली. महाराष्ट्राचे दिवंगत नेते व मुख्यमंत्री श्री. मां. सा. उर्फ दादासाहेब कन्नमवार हे गरीब घराण्यात जन्मलेले पण राजकारणात उत्तुंग शिखर गाठलेले वैदर्भीय नेते हे मा. भाऊसाहेबांचे प्रेरणास्थान व राजकीय गुरु होते.

माननीय स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी स्वतःला शैक्षणिक चळवळीसाठी वाहून घेतले आहे. व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन कर्मवीर दादासाहेब कन्नमवार अभियांत्रिकी महाविद्यालय, १९८३ साली नागपूर पॉलीटेक्निक व १९८९ मध्ये आयुर्वेद महाविद्यालय ह्या संस्थांची नागपूर येथे स्थापना केली. ह्या नामवंत संस्थेत तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ विदर्भातीलच नव्हे तर पूर्ण देशातील विद्यार्थी घेत आहेत. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटीच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या नागपूर येथील ह्या संस्था माननीय श्री. भाऊसाहेब मुळक यांच्या तडफदार व्यक्तिमत्व आणि उत्कृष्ट कार्यशैलीमुळे थोड्याच काळात भरभराटीस आलेल्या आहेत. त्यांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन हया संस्थांच्या भव्य वास्तू, प्रांगणे, मुलामुलींची वसतीगृहे, ग्रंथालये, क्रीडांगणे, व अद्यावत उपकरणांनी सज्ज प्रयोगशाळा उभारलेल्या आहेत. ही सर्व महाविद्यालये उच्च शिक्षाविभुषीत प्राध्यापकांनी युक्त आहेत. संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयात रुग्णांकरिता आंतरविभाग व बाह्य विभाग असून गरीब मागासवर्गीय जनता ह्या दवाखान्यात विनामूल्य लाभ घेत आहेत.

वरील महाविद्यालयीन संस्थांचे कार्य लक्षात घेऊन बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर ह्या शैक्षणिक संस्थेला महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता प्रोत्साहित केलेले आहे. आपल्या उमरेड ह्या जुन्या निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने व विशेषतः ह्या विभागातील मान्यवरांच्या विनंतीनुसार संस्थेचे संस्थापक – अध्यक्ष माननीय भाऊसाहेब मुळक यांनी भिवापूर ह्या ग्रामीण भागात सन १९९० साली भिवापूर महाविद्यालय भिवापूर स्थापन केले. भिवापूर क्षेत्रातील कमकुवत मागासवर्गीय व होतकरु विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सवलती उपलब्ध असून विशेषतः पूर्ण वर्गाकरिता विद्यार्थ्यांना पुस्तके देण्याची व्यवस्था केलेली आहे. सन १९९५–९६ सत्रापासून महाविद्यालयाचे वर्ग संस्थेच्या नवीन इमारतीत भरत आहेत. महाविद्यालयाची शैक्षणिक सोईनी उपयुक्त अशा भव्य वास्तूची निर्मिती प्रगती पथावर आहे. महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात मुलामुलींची वसतीगृहे, कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, अद्ययावत प्रयोगशाळा, क्रीडांगणे व भव्य ग्रंथालयांची बांधणी करण्याचा संस्थेचा संकल्प आहे.

मा. स्व. श्री. भाऊसाहेब मुळक यांनी उमरेड निर्वाचन क्षेत्रातील जनतेचे महाराष्ट्र विधानसभेवर प्रतिनिधीत्व करुन शासनात मंत्रीपद भुषविले हे सर्वांना माहीतच आहे. बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमेटीच्या माध्यमातून ह्या ग्रामीण भागातील जनतेचे ऋण फेडण्याच्या दृष्टीने खालील योजना आखलेल्या आहेत. भाऊसाहेबांनी योजलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वास नेण्यास व संस्थेच्या विकासासाठी त्यांचे चिरंजीव मा. राजेंद्रजी मुळक उर्फ बाबासाहेब (माजी राज्यमंत्री) सातत्याने प्रयत्नरत असतात. त्यांच्या तडफदार व कार्यप्रवण शैलीमुळेच संस्थांची दिवसेंदिवस भरभराट होत आहे हे लक्षात घ्यावेच लागते. संस्थेचे माननीय सचिव माजी मंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांनी संस्थेच्या शिक्षण वृक्षाला एक

## निर्धार

नवीन पालवी दिली. खेड्यातील तरुण हा स्वबळावर खंबीरपणे उभा असला पाहिजे यासाठी माननीय माजी राज्य मंत्री राजेंद्र मुळक साहेब यांनी अथक परिश्रमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक बाबींकडे लक्ष पुरविले व वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनातूनच भिवापूर महाविद्यालयाचा 'निर्धार' पक्का झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले साहित्यिक व कलागुण स्पष्ट व्हावे व विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या संदर्भात नवा जोश निर्माण व्हावा म्हणून 'निर्धार' ची संकल्पना पुढे आली. वाचकांना हा महाविद्यालयीन 'निर्धार' प्रचंड आवडेल अशी अपेक्षा आहे.

* नॅक चे 'ब' श्रेणीत मुल्यांकन.
* ग्रामीण भागातील सुशिक्षित महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी यथायोग्य सहकार्य.
* ग्रामीण भागात महिला गृहद्योग व शिवणकला शिकण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना.
* राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविल्या जात आहेत. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेसाठी प्रोत्साहन गुण दिले जातात तसेच आंतर महाविद्यालयीन खेळ/क्रीडा स्पर्धात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन गुण दिले जातात.
* महाविद्यालय परिसरात सामान्य जनतेच्या उपयोगासाठी भव्य सभागृह बांधण्याचा मानस आहे.
* भिवापूर महाविद्यालयात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. विषयांचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरु आहेत.
* भिवापूर महाविद्यालयात बी.लिब., एम. कॉम., एम.बी.ए., एम.एस.सी व विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणेच ग्रामीण विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासाचे शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून संस्था प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे.
* आंतरराष्ट्रीय स्तराचा तरंग तलावाचे – काम पूर्ण झाले असून आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे.
* भव्य जिम्नॅस्टिकची सोय उपलब्ध आहे.
* इनडोअर स्टेडीयम व भव्य क्रीडांगण उपलब्ध आहे.
* मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहांची सोय.
* महिला अध्ययन व सेवा केंद उपलब्ध आहे.
* एन.सी.सी पथक कार्यरत आहे.
* मुलींकरीता निःशुल्क ज्युडो कराटे प्रशिक्षण सुरु आहे.
* मुलींकरीता निःशुल्क फॅशन डिझाइनिंग अभ्यासक्रम उपलब्ध आहे.
* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे.
* रोजगाराच्या संधीसाठी महाविद्यालयात परिसर मुलाखतीचे आयोजन केले जाते.
* संगणक व इंटरनेट प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.
* संस्थेतर्फे के.डी.के. इंटरनॅशनल स्कूल ची सुरुवात.
* Bachelor of Vocational (B. Voc.) या व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुरुवात.

डॉ. जोबी जॉर्ज
प्राचार्य
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.

# संपादकीय

भिवापूर महाविद्यालय भिवापूर या ग्रामीण भागातील **'निर्धार'** हा वार्षिकांक वाचकांच्या हातात देतांना अतिशय आनंद होत आहे. या आधीच्या वार्षिकांकची प्रशंसा झाल्यामुळे हा वार्षिकांक फुलेल, बहरेल व फळास येईल यात शंका नाही. भिवापूर सारख्या ग्रामीण भागात असणारे महाविद्यालय व महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्याच कल्पना, स्फूर्ती, प्रेरणा व प्रतिभेचे सहज सूंदर रुप या वार्षिकांकात सादर झाले आहे.

यशस्वीतेसाठी आमचे महाविद्यालयीन विश्वच प्रेरक ठरते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांमधील लेखन शैलीचा विकास होऊन समाजाप्रती असलेल्या ऋणानुबंधाची जाणीव या निमित्ताने करुन देण्याच्या दृष्टीकोणातून निर्धार या वार्षिकांकाची संधी आम्हाला मिळाली.

संस्थाचालक स्व. श्री. मा. भाऊसाहेब मुळक यांचे प्रोत्साहन, संस्थेचे सचिव माजी मंत्री ना. राजेंद्रबाबु मुळक व महाविद्यालयाचे कर्तबगार प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या प्रयत्नांनी वरिष्ठ विभागात झाली. (बी.एस.सी.) विज्ञान शाखेची सोय तालुका स्तरावर या महाविद्यालयात झाली आहे. त्यामुळे कनिष्ठ शाखेपासून पदव्युत्तर कला शाखा व पदवीपर्यंत वाणिज्य, विज्ञान शाखेची सोय विद्यार्थ्यांना मिळाली आहे. संस्थेचे सचिव, माजी मंत्री मा. राजेंद्रबाबु मुळक यांनी ग्रामीण भागाशी जवळीक साधून समाजाची सेवा करण्याचा मार्ग पत्करला आहे. संस्थेचे ऋण कधीच विसरता येत नाही.

महाविद्यालयाने या भागात अन्यत्र कोठेही नसलेला पदव्युत्तर अभ्यासक्रम (समाजशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र) उपलब्ध करुन दिले आहेत. सोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान शाखेची सुरुवात कनिष्ठ व वरिष्ठ विभागात झाल्यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना 'जो जे वांछिल तो ते लाहो' या सत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील उक्तीप्रमाणे वर्ग ११ वी ते पदवी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेची संधी प्राप्त झाली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा हवा तो मार्ग पत्करावा या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा हे एक आव्हानच.

साहित्यिक व रसिकांच्या मधला दुवा साधून आम्ही 'निर्धार' रसिकार्पण करीत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची साहित्य सृजन निर्धारच्या माध्यमातून साकार होतांना अंकातील सर्वच लेखनाशी आम्ही सहमत आहोत असे नाही. तसेच या वार्षिकांकात समाविष्ठ झालेले साहित्य ही विद्यार्थ्यांची स्वतःची व संकलित केलेली लेखनकृती आहे असे गृहीत धरुन त्यांच्या साहित्याला स्थान दिले आहे. मागील अंकाप्रमाणे हा ही अंक सर्वांना आवडावा अशी अपेक्षा.

वार्षिकांकातर्फे सर्वांना शुभकामना!

| संपादक | मुखपृष्ठकार | मार्गदर्शक |
|---|---|---|
| कु. नेहा सावरकर (मराठी) | कु. ऋतूजा बनकर | डॉ. मधुकर नंदनवार |
| संकेत साबळे (इंग्रजी) | | प्रा. सोमश्वर वासेकर |

(या अंकातील सर्वच लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

# बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर

र.नं. महा. १५२/७४ नागपूर.

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. सौ. सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. वामनराव गोविंदराव मुळक | – | उपाध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ४. श्रीमती श्रीलेखा राजन लांजेकर | – | सहसचिव |
| ५. श्री. यशराज राजेंद्र मुळक | – | कोषाध्यक्ष |
| ६. श्री. दिलीप कृष्णराव महाडीक | – | सदस्य |
| ७. श्रीमती पद्मजाताई श्याम दांडगे पाटील | – | सदस्या |

# भिवापूर महाविद्यालय भिवापूर, जि. नागपूर

दूरध्वनी क्र. २३२३४९ (एस.टी.डी. ०७१०६)

## महाविद्यालय विकास समिती - २०१८-१९

| | | |
|---|---|---|
| १. श्रीमती सुमनमाला भाऊसाहेब मुळक | – | अध्यक्षा |
| २. श्री. राजेंद्र भाऊसाहेब मुळक | – | सचिव |
| ३. डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे | – | विभागप्रमुख |
| ४. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ५. डॉ. अनिता विवेक महावादीवार | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ६. प्रा. राजश्री ओ. पी. | – | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ७. श्री. सुधाकर गणपत उईके | – | अध्यापकेत्तर कर्मचारी |
| ८. श्री. पद्माकर कुंजिलालजी अग्रवाल | – | स्थानिक सदस्य |
| ९. श्री. प्रभाकरराव चव्हाण | – | स्थानिक सदस्य |
| १०. श्री. दिलीप मोतीलालजी गुप्ता | – | स्थानिक सदस्य |
| ११. कु. स्नेहल राठोड (माजी विद्यार्थिनी) | – | स्थानिक सदस्य |
| १२. डॉ. मंगेश वसंतराव कडू | – | समन्वयक (नॅक) |
| १३. कु. निधी संजय साबळे | – | विद्यार्थी परिषद सचिव |
| १४. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | – | सदस्य सचिव |

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## महाविद्यालय प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्रभारी प्राध्यापक |
| ३. | प्रा. अनिता महावादिवार | विद्यार्थी परिषद प्रभारी |
| ४. | डॉ. विजय दिघोरे | रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी |
| ५. | डॉ. नितीशा पाटणकर | सांस्कृतिक विभाग प्रमुख |
| ६. | प्रा. आदित्य सारवे | क्रीडा विभाग प्रमुख |
| ७. | आकाश मसराम | विद्यार्थी क्रीडा प्रमुख |
| ८. | कु. पुष्पा संदेश | सांस्कृतिक विभाग प्रतिनिधी |
| ९. | जावेद पठाण | रा.से.यो विद्यार्थी प्रतिनिधी |

## विद्यार्थी साहित्य मंडळ

कु. नेहा सावरकर
प्रणित ठाकरे
कु. अश्विनी दिघोरे
कु. रचना नंदेश्वर
कु. खुशबु बगडे
कु. स्वाती मानकर

## मार्गदर्शक

डॉ. मधुकर नंदनवार
डॉ. सुनिल शिंदे
डॉ. मोतीराज चव्हाण
प्रा. सोमेश्वर वासेकर
डॉ. विजय दिघोरे
डॉ. अनिता महावादिवार

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

## प्राध्यापक वृंद (वरिष्ठ विभाग) कला

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. जोबी जॉर्ज | प्राचार्य (इंग्रजी) |
| २. | डॉ. सुनिल कृ. शिंदे | प्राध्यापक (अर्थशास्त्र) |
| ३. | डॉ. मंगेश व. कडू | प्राध्यापक (राज्यशास्त्र) |
| ४. | डॉ. मोतीराज रा. चव्हाण | प्राध्यापक (इतिहास) |
| ५. | डॉ. मधुकर वि. नंदनवार | प्राध्यापक (मराठी) |
| ६. | डॉ. विजय शं दिघोरे | प्राध्यापक (समाजशास्त्र) |
| ७. | डॉ. राहील कुरैशी | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ८. | प्रा. सोमेश्वर वासेकर | प्राध्यापक (इंग्रजी) |
| ९. | प्रा. आदित्य सारवे | प्राध्यापक (शारीरिक शिक्षण) |
| १०. | प्रा. राजश्री ओ. पी. | प्राध्यापिका (ग्रंथपाल) |
| ११. | डॉ. विनिता विरगंधम | प्राध्यापिका (इंग्रजी) |

## वाणिज्य विभाग वरिष्ठ व कनिष्ठ

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अनिता महावादीवार | प्राध्यापिका वाणिज्य |
| २. | डॉ. राजेश बहुरुपी | प्राध्यापक वाणिज्य |
| ३. | प्रा. कु. वर्षा मेश्राम | प्राध्यापिका (वाणिज्य) घडयाळी तासिका |
| ४ | प्रा. चेतन हेडावू | प्राध्यापक (वाणिज्य) घडयाळी तासिका |

## कनिष्ठ विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. किशोर घ. शेंडे | – | (राज्यशास्त्र, इतिहास) |
| २. | प्रा. उषा ना. चु–हे | – | (मराठी, समाजशास्त्र) |
| ३. | डॉ. वैशाली प्र. रहाटे | – | (इंग्रजी, अर्थशास्त्र) |
| ४. | प्रा. सागर यादव | – | विज्ञान |
| ५. | प्रा. स्वप्निल डाखोळे | – | विज्ञान |
| ६ | प्रा. ज्योती बान्ते | – | मराठी |
| ७ | प्रा. चेतना ठाकरे | – | वाणिज्य |

## वरिष्ठ विभाग - विज्ञान शाखा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. नितीशा पाटणकर | – | प्राध्यापिका (प्राणीशास्त्र) |
| २. | डॉ. सारंग धोटे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |
| .3. | प्रा. अमित काळबांडे | – | प्राध्यापक (रसायनशास्त्र) |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय मेश्राम | – | कनिष्ठ लिपीक |
| २. | श्री. अमोल वि. भगत | – | कनिष्ठ लिपीक |
| ३. | श्री. शंकर को. फेंडर | – | शिपाई |
| ४. | श्री. रत्नाकर रा. कन्नाके | – | शिपाई |
| ५. | श्री. अ. जफार अ. गफ्फार | – | शिपाई |
| ६. | श्री. गुलाब र. गेडेकर | – | ग्रंथालय परिचर |
| ७. | श्रीमती सविता म. झोडापे | – | शिपाई |
| ८. | कु. हर्षलता बोडे | – | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ९. | श्री. गणेश शहाणे | – | प्रयोगशाळा परिचर |
| १०. | कु. जीजा पराते | – | प्रयोगशाळा परिचर |
| ११. | श्री. खुशवंत दमके | – | प्रयोगशाळा परिचर |

# क्षणचित्रे




आय.सी.एस.एस.आर. प्रायोजित विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या अधिवेशनाचे उद्घाटन करतांना अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. मुरलीधर चांदेकर, सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस व अध्यक्ष मा. डॉ. राजेंद्र भांडवलकर



मराठी अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक व प्रमुख वक्ते डॉ. राजेंद्र वाटाणे, कोराडी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना



'अर्थवेद' स्मरणीकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन सोहळा



मराठी विभागातर्फे भित्तीपत्रक प्रदर्शनीचे अवलोकन करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, डॉ. राजेंद्र वाटाणे व इतर मान्यवर



अर्थशास्त्र परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा. डॉ. मृणालिनी फडणवीस



मराठी अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी विशेष अतिथी डॉ. राजेंद्र जाने, भिसी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना

# क्षणचित्रे



इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी उद्‌घाटक
मा. डॉ. श्याम कायंदे, उद्‌घाटनपर मार्गदर्शन करतांना



अर्थशास्त्र अधिवेशन प्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. सुनील शिंदे प्रास्ताविक करतांना



इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख वक्ते
मा. डॉ. श्यामराव कोरेटी इतिहास विषयाची
माहिती देतांना



ग्रंथालया तर्फे आयोजित उद्‌बोधन वर्गाचे उद्‌घाटन प्रसंगी
डॉ. अश्विनी पराडकर यांचे स्वागत करतांना
प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



इतिहास अभ्यास मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी
अध्यक्षीय भाषण करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दिवाणी व फौजदार न्यायालय
आयोजित कार्यक्रमात माहिती देतांना मा. ठाणेदार

# क्षणचित्रे



मराठी भाषा दिन दिनांक २७ फेब्रुवारी कुसुमाग्रज जयंती निमित्ताने मराठी अभ्यास मंडळाची सचिव आपले मनोगत व्यक्त करतांना



वार्षिकोत्सवाचे उद्‌घाटन प्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. पद्‌माकरजी अग्रवाल



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थ्यांना सांख्यिकी विषयी मार्गदर्शन करतांना महेश चौधरी



२ ऑक्टोबर अहिंसा दिंडीची हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



वाचनालयातर्फे उद्‌बोधन वर्गातील विद्यार्थी परीक्षा देतांना



महाविद्यालयातील एन. सी. सी. पथकातील विद्यार्थी स्वातंत्र्यदिनी कवायत सादर करतांना

# क्षणचित्रे




राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीर प्रसंगी विशेष अतिथी डॉ. नथ्थूजी गिरडे भाषण देतांना



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीर प्रसंगी अड्याळ येथे वैद्यकिय तपासणी करतांना ग्रामीण रुग्णालय भिवापूरची चमू



राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीरात श्रमदान करतांना रासेयोचे स्वयंसेवक




वार्षिकोत्सव प्रसंगी मिस्टर भिवापूर महाविद्यालय पदक विजेत्याचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



वार्षिकोत्सव प्रसंगी समुह नृत्य सादर करतांना विद्यार्थी




वार्षिकोत्सव प्रसंगी मिस भिवापूर महाविद्यालय पदक विजेतीचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज

# 'निर्धार' वार्षिकांक
# मराठी विभाग २०१८ - १९

## विद्यार्थी संपादक



## कु. नेहा सावरकर

## मार्गदर्शक
## प्रा. डॉ. मधुकर नंदनवार

## ज्ञानोबा माऊली



आळंदी म्हणजे पुण्यभूमी
जिथे वास करते
ज्ञानोबा माऊली
मन शांत करण्याची
ताकद जिथे आहे
ती माऊली येथे
साक्षात उभी आहे.
साधकास संजीवनी
माय माऊली देतात
त्या माऊलीचे नाव
घेता पापही जातात.
दृष्टी पडता संजीवन समाधी
मन शांत होते आधी
साधकास पूर्णत्वास नेते
ज्ञानोबा माऊली माझी.

## कसं वागायचं असतं !

फुललेल्या फुलाला फुलु दयायचं असतं
त्याला अजिबात तोडायचं नसतं।
पाखराला स्वतंत्र भरारी मारु दयायचं असतं
पकडून पिंजऱ्यात टाकायचं नसतं ।
आपण कोण आपल्याला कळत असतं
कोणाला कमी लेखायचं नसतं ।
जीवन काचेसारखं पारदर्शक असतं
त्याला अजिबात तडा जाऊ दयायचं नसतं
एक दिवस आपण नष्ट होणार हे नक्की असतं.

कल्याणी मोहोड
बी. ए. तृतीय

## खेळ हा सावलीचा

स्वप्नांवर आरुढ होऊन,
वेध घ्यावा नशिबाचा,
काबीज करावा किल्ला,
शिखरावरच्या यशाचा.

सुगंधी गुलाब होऊन,
वेध घ्यावा काट्यांचा,
उन्हातही खेळता यावा,
खेळ हा सावल्यांचा.

कल्पनेत मग्न होऊन,
वेध घ्यावा शब्दांचा,
विरहातही वाटावा
क्षण प्रत्येक प्रेमाचा.

स्वच्छंद भरारी मारुन,
वेध घ्यावा गगनाचा
हळुच शोधता यावा,
सुर्य या जीवनाचा.

कु. प्रिया बंडुजी मांढरे
बी. ए. तृतीय



## आयुष्य



का बरं ! आयुष्य असं जगावं लागतं.
हृदयात दुःख पण ओठावर
हसू आणावं लागतं
खूप हवी हवीशी वाटते एखादी गोष्ट पण ........
हसत हसत त्यांना दूर
जाताना पहावं लागतं
नकळत त्यापासून खूप दूर जावं लागतं
स्वतःच्या इच्छा, आकांक्षा लपवून
का बरं समाजाच्या रिती रिवाजांना
प्रेमाने जगावं लागतं
का बर ! आयुष्य अस जगावं लागतं ।

## शेतकरी



शेतकरी आहे जगाचा पोशिंदा
तरी कदर नाही त्याची कोणा
राब राब राबतो स्वतः उपाशी राहतो
आणि साऱ्या जगाला
अन्नाचा साठा पुरवितो.
स्वतः मात्र उपाशी मरतो
त्याच्या घरी जाऊन बघावे सरकारनी
तो कसा जीवन जगतो.
अरे ! जो महत्वाचा आहे त्याला विसरता
आणि क्रिकेट वर करोडो पैसे उडवता
त्याला नको काही फक्त त्याला हक्कच द्या.
त्यांलाही सुखी आणि समाधानी जीवन जगू द्या.

प्रताप ठवकर
बी. ए. प्रथम



## शिक्षकाभिमान

शिक्षकांचा सदा मला अभिमान आहे
शिक्षकांविषयी मला स्वाभिमान आहे

माणूस घडविण्याचे काम करतो
त्यामुळे समाजात मला सन्मान आहे

माझी वागणूक एक आदर्श ठरते
म्हणून चार लोकांत मला मान आहे.

काय करावे अन् काय करु नये
पदोपदी याचे मला अवधान आहे

नव्या तंत्रज्ञानांविषयी मुलांना
सजग करण्याचे मला ज्ञान आहे.

प्रगतीपथावर नेणारा सुजाण असा
नागरिक घडविण्याचे मला भान आहे.

कु. स्वाती गिरी
बी. ए. प्रथम

## जागा नवजवानो जागा

हे मानवा एक तरी झाड लाव
फुलव रे मला एक तरी झाड लाव
तुझ्या घरी दारी अंगणात कुंडीमध्ये
मला थोडीशी जागा दे
फुलव रे मला तु ..........
मला तोडल्याने वाढेल रे प्रदुषण
निरोगी जीवाला हे रोगाचे आमंत्रण
तुम्ही विचार करा वृक्ष लावा घरोघरी
तुम्हा मिळेल रे निवारा कधीतरी
फुलव रे मला तु ...........
जंगल तोडीमुळे पाऊस पडत नाही
पाऊस पडत नाही म्हणून पीक येत नाही
त्यामुळेच शेतकरी आत्महत्या करतो
त्याला सरकार जबाबदार ठरतो.
फुलव रे मला तु ...........






## जागा नवजवानो जागा

आता आलं राजकारण जातीचं
कोणीच नाही या मातीचं
घोटाळा करतात येथे सगळेच
मरणे आहे आम आदगीचेच.
संकु म्हणे सतर्क व्हा नवजवानो
एकजातीने लढा माझ्या भावांनो
मग जगी शोभेल आपली भारत भूमी
प्रचार होईल जगाच्या प्रत्येक कानी
प्रत्येक व्यक्ती सांगेल गर्वाने
जन्म दिला मला भारत मातेने
दाही लोकांत प्रकाश पसरेल भारताचा
हा प्रकाश असेल एक जातीने लढण्याचा
म्हणून संकु नेहमी म्हणतो लढा देशासाठी
तोंडाजवळ येईल अमृताची वाटी
मग देव सुद्धा धावून येईल तुमच्यापाशी
आणि मिठी मारेल तुमच्या अंगाशी

संकेत साबळे
बी. ए. प्रथम

## थोरांचे बोल

दुसऱ्याला हसणे फार सोपे असते, पण दुसऱ्याकरीता रडणे फार कठीण असते. त्याला अंतःकरण असावे लागते.

साने गुरुजी



जीवन हे आपल्याला संधी असते. संधी मिळाल्यावर तुम्ही मनापासून एखादे काम केले तर तुम्हाला ईश्वराचा आशिर्वाद मिळेल.

डॉ. राधाकृष्णन



भारत हाच तुमचा देव आणि तुमच्या देशबांधवांची सेवा हीच तुमची देवपुजा होय. प्रथम स्वयंसेवक व्हा, देशसेवक व्हा, मग तुम्ही देशाचे स्वामी आपोआपच व्हाल.

स्वामी विवेकानंद



नीटनेटकेपणाने सौंदर्यदृष्टी येते, ही दृष्टी आल्याने व्यक्ती जीवनात रस घ्यायला शिकते, जीवन नीरस न वाटता रसास्वाद घेण्याची क्षमता वाढीला लागते.

महात्मा गांधी



सर्वात मोठे पाप म्हणजे अन्यायाशी तडजोड करणे.

सुभाषचंद्र बोस



वैज्ञानिक दृष्टी असलेला आशावादी मनुष्य एक नवी स्फुर्ती आणि शक्ती घेऊनच सदैव वावरत असतो. शांततापूर्ण आणि सफल जीवन यासाठी शरीरापेक्षाही मनाला मी अधिक जबाबदार समजतो.

सर विश्वेश्वरैय्या





संग्रहक

विकीता उईके

बी. ए. द्वितीय



## सुविचार

मुक्त आणि निर्भय मनाचा व्यक्ती निर्माण करणे हा खरा शिक्षणाचा हेतू आहे.

तरुणाच्या पंखांना कोणत्याही क्षितिजाचे बंधन नसते. त्यांना फक्त आकाशाची ओढ असते.

पुस्तकाचे वाचन असल्याशिवाय कोणताही माणूस खऱ्या अर्थाने शिक्षित किंवा जिवनात यशस्वी होत नसतो.


पुर्णतः प्रामाणिक व्यवसाय करणे कठीण असले तरी अशक्य नसते.

कल्पना या इतिहासाच्या घडणीला मार्गदर्शक ठरतात.

आजची गुंतवणूक ही भविष्याची बांधिलकी आहे.

अध्ययनाचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्या विषयाचे अध्यापन करणे होय.

जगातील प्रत्येक वस्तू सुंदर असते फक्त पहाण्याचा दृष्टीकोन चांगला असावा.



मनामध्ये समाधान असेल तर आपण दुःखात सुद्धा सुख शोधू शकतो.

ज्ञान हा अमूल्य ठेवा आहे.

जन्म हा खूप जबाबदारी देत असतो आणि मृत्यु सगळ्या कर्तव्यातून मुक्त करीत असतो.

सुरेखा मांढरे
बी. ए. तृतीय

माणुस किती मोठा झाला यापेक्षा कसा मोठा झाला याचा आपण विचार केला पाहिजे.

संस्कार हे सर्वात मोठे असतात. योग्य संस्कार म्हणजे सुंदर भविष्याकडे वाटचाल.

कुठल्याही व्यक्तीची रुपात्मक सुंदरता न बघता आपण त्यची गुणात्मक सुंदरता बघावी. कारण आपल्या रुपाला नाही तर गुणांना अधिक महत्व असते.

बाह्य सुशोभिकरणावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा मनाच्या सुशोभिकरणावर लक्ष केंद्रित करणे केव्हाही उत्तमच.

नेहा सावरकर
बी. ए. द्वितीय



## सुविचार



ज्ञान मानवाचे अमृत आहे.

आजचे युग हे विज्ञान युग आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा अधिक अभ्यास करावा.

शिक्षक हे केवळ पदवीधर म्हणून चालणार नाही तो विद्याधर हवा ...... ज्ञानधर हवा ....... उगवत्या पिढीला जीवन शिक्षण देतो तोच खरा शिक्षक.

आई ही प्रथम एक गुरु आहे.

शाळा हे शिक्षणाचे मंदिर असून, जीवन घडविण्याचे केंद्र आहे.

विद्या म्हणजे ज्ञान, जेणे करुन माणूस निर्मळ होतो, विचार समर्थ होतो.

जगाचा कधी कधी उद्धार झाला तर शिक्षकांकडूनच होईल.

सर्वात चांगले पाठ्यपुस्तक म्हणजे शिक्षक होय.

विद्येशिवाय माणसाला स्वतःची ओळख होऊ शकत नाही.

जीवन घडविण्यासाठी ज्ञान संपादन करणे गरजेचे आहे.

नम्रता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे.

आवड असली तर सवड आपोआप होते.

एक चांगला विचार अनेक वाईट विचारांना नाहिसा करतो.

जगात समस्या नसते, असते ती फक्त संधी.

अपयशाच्या कठिण दगडाखाली यशाच्या पाण्याचा निर्मळ झरा असतो.

स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना वाव देणारे प्रभावी माध्यम आहे.

भिकेच्या पोळीपेक्षा, कष्टाची भाकरी चांगली.

श्रम न करता जगणे हा मोठा गुन्हा आहे.

जन्म आणि मृत्यु यातील अंतर, म्हणजेच जीवन.

जीवन हे यश आणि अपयश याचे मिश्रण आहे.

दान केल्याने आजपर्यंत कोणीही गरीब झाला नाही.

हास्य ही जीवनाची संजीवनी आहे.

## आठवण



ड्युटीवरील खुर्चीपेक्षा माझ्या
कॉलेजचा बाकच बरा होता,
कामाच्या ह्या व्यापापेक्षा
आमचा गृहपाठच बरा होता ........
कितीही असला नोकरीचा लळा,
तरी माझ्या शाळेचा फळाच बरा होता.
वरिष्ठांच्या सततच्या टेंशनपेक्षा
गुरुजींच्या छडीचा मारच बरा होता .......
मोबाईल वरील व्हॉट्सअप फेसबुक पेक्षा
मैदानी खेळांचा थाटच मोठा होता .....
हरलो आहे शहरात सुख मिळवण्यासाठी
पण मित्रा आपला तो काळच बरा होता.

पंकज रामभाऊ तिडके
बी. ए. तृतीय



## आईची महती

आई म्हणजे काय असते ?
लेकराची माय असते !
वासराची गाय असते !
दुधाची साय असते !
लंगड्याचा पाय असते !
आंधळ्याचा डोळा असते !
मुक्याचा आवाज असते !
बहिऱ्याचा कान असते !
निराधाराचा आधार असते !



आणखी काय सांगु,
आई म्हणजे काय असते ?
'आ' म्हणजे आत्मा
तर 'ई' म्हणजे ईश्वर असते ।
ती नी असते, ती परमेश्वराची
गोड भेट असते !
आणि काय ? तर
आई म्हणजे आई असते !



कल्याणी मोहोड
बी. ए. तृतीय



## सुख

सुख हे मिळणार नाही कोठे
ते असतेच असे कुठे
दुःखरुपी या संसारात
ते असतच नाही कोठे ।

सुख हे शोधायचे असते
दुःखाच्या प्रत्येक क्षणात
समाधानी वृत्ती असली
की ते आपोआपच गवसते ।

मन शांतीची सवय असली
की सुख दिसते सगळीकडे
गरीब सज्जनांना सहाय्य झाल्यास
त्या नेत्रात सुख दिसते ।

जीवन हे असेच असते
पाण्यातील तरंगा सारखे
सुख शोधले की
सापडतच असते .......



## स्वार्थ

कलियुगाने माणुसकी चोरली
माणसात स्वार्थी वृत्ती पेरली
सुंदर पृथ्वी माणसांची म्हणूनी
उतावळा होऊनी आलो जन्मी ।।

स्वार्थाने माणसाचा बैल झाला
माणुस जन्माचा पश्चाताप आला
स्वाक्षी राक्षसाच्या या अंधारात
देवानेच फसविले मला या जाळात ।।

स्वार्थाने कोण काय घेऊनी आला गेला
शेवटी प्रत्येक माणुस पृथ्वीवरच मेला
मग कोणता हेतू स्वार्थ करुनी
रिकाम्या हाताने जायचं ह्या जगातूनी ।।

संकेत साबळे
बी. ए. प्रथम

## आई आणि बाबा



आईने जन्म दिला, तिने सारे जग दाखविले, तिने किती कष्ट केले, तिने किती साहिले,
आई–बाबांचे ते घर म्हणजे देवाचे मंदिर , सुख शांती जशी आई–बाबांत मिळते तशी कोणातही नाही.
आई–बाबा या मुर्तीवाणी दुसरी जगात मुर्तीही नाही.
मातेची ही निर्मल छाया पृथ्वीवरील मुलावर सर्वात जास्त पडते. आई आणि बाबा खूप खूप राबून आपल्या मुलाला सांभाळते.
आई–बाबा ही चंद्राची कोर असते, आई–बाब हे घरची सावली असते. आई आणि बाबा जग दाखविणारे दैवत असते.

कु. पुनम कापगते
बी. ए. द्वितीय

## मैत्री

तू खुप सुंदर आहेस
पण तुझ्या सुंदरतेवर कधी
प्रेम केलं नाही मी ........
तु खुप गोड आहेस पण
तुझ्या चेहऱ्याकडे पाहून
प्रेम नाही झाले मला
प्रेम तर झाले आहे
मला तुझ्या सुंदर मनावर
तुझ्या बोलक्या डोळ्यांवर
तुझ्या डोळ्यांकडे पाहिलं तर,
स्वतःला हरवून जाते.
आणि राहिलं मन तर
ते खुप निरागस आहे तुझं
आणि मला दुखवायचं नाही त्याला ..........
माझ्यासाठी तु महत्वाचा आहे
आणि नेहमी राहणार .......
आयुष्याच्या एका भेटीत
एकदा तरी नक्की सांगेल तुला.
खुप खास आहे माझ्यासाठी तु
खुप म्हणजे खुप खास आहेस
माझ्यासाठी तु .........

कु. हर्षा खोब्रागडे
बी. कॉम. प्रथम



## स्त्री जन्मा .........

आजी म्हणायची,

उपास – तापास कर, पुजा–पाठ कर ...... सासर चांगलं मिळेल.

आजोबा म्हणायचे

शांत राहा, समजुतीनं घे ....... सासरी निभाव लागेल.

आई म्हणायची,

घरची चार कामं शिक ........ सासरी सोपं जाईल.

काकू म्हणायची,

धड–धड चालु नको, जोरात बोलू नको ...... सासरी नावं ठेवतील.

काका म्हणायचे,

जिन्स नको, टिकली लाव, बांगड्या घाल ..... सासरी चालत नसतं.

आत्या म्हणायची,

डान्स, कराटे कशाला ? शिवणकाम, कलाकुसर शिक, सासरी उपयोग होईल.

मावशी म्हणायची,

सारखं पुस्तक, अभ्यास करु नकोस, चार माणसांत उठ–बस ........ सासरी हेच करावं लागतं.

पण .......

**फक्त बाबा म्हणायचे,**

जग बाळा मनसोक्त, मनमुराद, तुला हवं तसं भरभरुन.... तुला हवं ते घाल, हवं तेवढं शिक, ओरड, खेळ, नाच, फिर मनमोकळेपणाने ........... कारण तु तुझ्या हक्काच्या घरी आहेस. तु तुझ्या माहेरी आहेस.



कु. कल्याणी मोहोड

बी. ए. द्वितीय

## माझा पहिला गुरु माझी आई

माझ्या आयुष्याची सुरुवात या दोन शब्दांपासून झाली, त्यावेळेस या दोन शब्दाचा अर्थही समजत नव्हता. आणि आता अर्थ काढायला शब्द कमी पडतात जे शब्द तिनेच मला शिकविले. तिच्याच डोळ्यातून पहिल्यांदा मी या जगाकडे पाहिलं त्या प्रेमळ नजरेने.

आजही तसेच पाहण्याचा प्रयत्न करतो. तिने मला प्रेम करायला शिकविले जगावर, माणसांवर. प्रेमाची भाषा शिकविली., जी कुठल्याच शाळेत शिकविली जात नाही.

**अशी माझी आई, माझी पहिली गुरु.**

प्रिया मांढरे

बी. ए. द्वितीय

## कसं जगायचं

आयुष्य जगणं ही एक कला आहे.
कसं जगायचं हे ज्याचं त्यानी ठरवायचं
दु:ख सगळ्यांनाच असतात मग
दु:खाला सामोरं जायचं की
दु:खात पिंजत बसायचं हे
ज्याचं त्यानी ठरवायचं असतं.
उदयाची चिंता सगळ्यांनाच असते.
त्याची शाश्वती मात्र कोणालाच नसते.
मग उदयासाठी मरायचं की
आजच्या दिवसामध्येच संपूर्ण आयुष्य जगायचं
हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.
समाजात जर आपलं अस्तित्वं टिकवायचं असेल तर
स्पर्धा ही अटळ आहे, पण ही स्पर्धा
दुसऱ्याशी आहे की, स्वतःची स्वतःशीच आहे
हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.
समाज ...... समाज हा दुसऱ्यांची निंदा
करण्यासाठीच असतो, मग
कुणासाठी जगायचं समाजासाठी की स्वतःसाठी
हे ज्याचं त्याने ठरवायचं असतं.

कु. कल्याणी मोहोड
बी. ए. द्वितीय



## असे हे आयुष्य

म्हणालो तिला मी
नको ही गुलामी
लढ्यास आलो
पुढे आज 'हा' मी
तिची आठवण तर
जशी रे सुनामी
मला मी नं कळलो
कळलो कुणा मी
जरी मी निखारा
इथे काय कामी
बघा चोर देतो
खिशाला सलामी
परके आपुले झाले
आपले कुणास म्हणू मी
इथे ना कुणाची साथ
सोबत कुणास घेऊ मी
आयुष्याची ही वाट
झाली आज खडतर
आयुष्य कशास म्हणू मी ?

निर्मला निमजे
बी. ए. तृतीय





## प्रेरणादायी



खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्यांच्यासाठी नवं काहीतरी शिकण्याची संधी असते.

मनाचे दरवाजे नेहमी खुले ठेवा ; ज्ञानाचा प्रकाश कुठून कधी येईल हे सांगता येत नाही.

केवळ संपत्ती नव्हे तर उच्च विचारांच्या भक्कम पायांवर यशस्वी माणसांच्या आयुष्याची इमारत उभी असते.

मोती बनून शिंपल्यात राहण्यापेक्षा दवबिंदू होऊन चातकाची तहान भागविणे जास्त श्रेष्ठ.

कुठल्याही गोष्टीचा शेवट तोपर्यंत होत नाही, जोपर्यंत तुम्ही प्रयत्न करणं थांबवत नाही.

न हरता ..... न थकता ..... न थांबता प्रयत्न करणाऱ्यांसमोर कधी कधी नशीब सुद्धा हरते.

आशा सोडायची नसते, निराश कधी व्हायचं नसतं,
अमृत मिळत नाही, म्हणून विष कधी प्यायचं नसतं.

स्वप्न म्हणजे झोपल्यावर बघायची गोष्ट नाही. स्वप्न म्हणजे जे तुम्हाला झोपू देत नाही ते.

जेव्हा लोक तुमच्या मागे बोलतात तेव्हा समजून घ्यावं की .... तुम्ही त्यांच्या दोन पाऊले पुढे आहात .. ।।

कु. तृष्णा महाजन
बी. कॉम. प्रथम



## प्रेम म्हणजे काय असते

प्रेम म्हणजे काय असते ?
तर, प्रेम म्हणजे विधात्याला पडलेलं सुंदर असं स्वप्न असते, दोन जिवाच्या भावना असतात.
एकाला दुःख झालं की दुसऱ्यालाही दुःख होते,
एकाच्या डोळ्यात आसवे आले की
दुसऱ्याच्याही डोळ्यात आसवे येतात.
प्रेम ही मनामनात जपणारी भावना असते.
कितीही दूर असले तरी प्रेम मात्र कमी होत नसते.
पण ह्या भावना कुणाला कळत असतात तर कुणाला कळत नसते.

कु. तृप्ती खोब्रागडे
बी. ए. तृतीय

## एक तरी मैत्रीण असावी .....



एक तरी मैत्रीण असावी
हसणारी आणि हसवणारी
रडणारी आणि रडवणारी
समजुन सांगणारी, समजुन घेणारी
एक तरी मैत्रीण असावी .........

एक तरी मैत्रीण असावी
चेष्टा करणारी अन् खूप सतावणारी
अश्रू देणारी अन् अश्रू पुसणारी
एक तरी मैत्रीण असावी ......

एक तरी मैत्रीण असावी
मनातलं ओळखणारी अनं मन मोकळं करणारी
सावली सारखी सोबत देणारी
आयुष्यभर मैत्री निभावणारी
एक तरी मैत्रीण असावी .....

अश्विनी दिघोरे
बी. ए. द्वितीय

## दुःखाचे स्वापद



दुःख म्हटलं की,
हे सर्वांच्या जीवनात असतेच,
कुणाला क्षणभर दुःखाचा सामना करावा लागतो तर
कुणाला संपूर्ण आयुष्यभरच दुःखाचा सामना करावा लागतो.
दुःखात जगणाऱ्यांना सुखाचा विसर
पडलेला असतो .........
दुःख हे वळणावळणावर सोबत असणारी गोष्ट असते.
आणि जो खुळा असतो, त्या व्यक्तीचा पिच्छा
दुःख कधीच सोडत नाही.
कुणाचे दुःख स्वतःचेच असतात तर
कुणाचे दुःख हे गरीब व्यक्ती किंवा
कुणावर अत्याचार होत असणाऱ्या व्यक्तीसाठी असतात
दुःखात व्यक्तीचा चेहरा स्तब्ध, मनात तळमळ, डोक्यात
विचार आणि डोळ्यात सदैव अश्रू भरुन असतात.

तृप्ती खोब्रागडे
बी. ए. तृतीय



## महापूर

नदीचं पाणी जेव्हा पात्रातून बाहेर पडून स्वतःच्या घराच्या
उंबऱ्याला लागतं तेव्हा कळतं की,
महापूर म्हणजे नेमकं काय असतं ? ....
जेव्हा स्वतःचं घर सोडून दुसरीकडे स्थलांतरीत व्हायची
वेळे येते तेव्हा कळतं की,
पुरग्रस्त म्हणजे नेमकं काय असतं ? ....
पुरात अडकलेल्यांना जेव्हा Rescue Team वाचविते
तेव्हा कळतं की, N.D.R.F. Team म्हणजे काय असतं.
एकेवेळच्या जेवणासाठी सुध्दा आपल्याला
एखाद्याची वाट बघावी लागते. तेव्हा कळतं की,
अन्नछत्र फाऊंडेशन म्हणजे नेमकं काय असतं ...
मोडून पडते जेव्हा सारं काही
पण लढण्याची जिद्द कायम असते.
तेव्हा कळते कुसुमाग्रज यांची 'कणा' ही कविता नेमकी
काय होती ......
घरात बसून सोशल मिडियावर
पुराचे अपडेट सगळेच टाकतात,
पण जेव्हा स्वतः जाऊन तिथं मदत कार्यात आपण
उभारतो, तेव्हा कळतं की ......
'माणुसकीचा धर्म' म्हणजे काय असतो ।


अंकिता भोयर
बी. ए. प्रथम



## जीवन म्हणजे काय ?

जीवन म्हणजे काय आहे
जगलो तर नुसते शरीर आहे
मृत्युनंतर तर आत्मा आहे
जीवन म्हणजे काय आहे .....
इतरांच्या सुख–दुःखात
घेतलेला मनःपूर्वक सहभाग आहे.
मरणानंतर त्या लोकांची
आपल्या प्रेतयात्रेत मिळालेली साथ आहे
जीवन म्हणजे काय आहे .....
इतरांसाठी मनोभावे केलेला परमार्थ आहे.
आणि स्वतःसाठीच जगलो तर
त्या जगण्यात फक्त स्वार्थ आहे
जीवन म्हणजे काय आहे ....
प्रेमाने दुसऱ्यांशी बोललो तर
त्यात आपुलकीचा भास आहे
इतरांशी उध्दटपणे वागलो तर
नुसता द्वेष आणि राग आहे.
खरच जीवन हे अमर आहे.
जगणे वा मरणे
हा त्या परमेश्वराचा खेळ आहे.

अश्विनी दिघोरे
बी. ए. द्वितीय



## प्रेरक गोष्टी

माणसाला विशिष्ट उंचीवरुन खाली आणणारा गर्वापेक्षा वेगवान मार्ग नाही.

स्वप्नं पाहात असालच तर मोठे पहा. लहान कशाला ? कारण मोठ्या स्वप्नांतच माणसाचे रक्त ढवळून काढण्याची ताकद असते.

सोपी होण्याआधी कुठलीही गोष्ट कठीण नसते.

जो खुपच सुरक्षित आहे, तो असुरक्षित आहे.

एकाच वेळी दोन कामे करणे म्हणजे दोन्ही पैकी एकही काम न करणे.

चालता आणि धावता येण्यासाठी माणसाला रांगावं लागतं.

यंत्र हे काम करण्यासाठी आणि व्यक्ती हा विचारासाठी निर्माण झाला आहे.

ज्ञानाला अर्थ कृतीमुळे प्राप्त होतो. कृती नाही तर ज्ञानाला अर्थ नाही.

तुम्ही जे आतापर्यंत करत होता तेच पुन्हा कराल तर तुम्हाला तेच मिळेल जे आतापर्यंत मिळत आले आहे.

ध्येयावर न पोहोचणे ही शोकांतिका नाही तर पोहोचण्यासाठी ध्येय नसणे ही खरी शोकांतिका आहे.

पायल वाघमारे
बी. ए. प्रथम

## आई

सकाळची सुंदर अशी वेळ होती. सुट्टीचा दिवस होता. आज सर्वजण घरीच होते. काल परवाच एक गोड बातमी कानावर आली होती. घरच्या गाईला एक छानसं गोंडस वासरु झालं होतं. ते वासरु कोणत्याही माणसाच्या मागे यायचं, खेळायचं. आणि अचानक एक दिवस खेळता–खेळता वासरु कुठे गेलं कुणालाच कळलं नाही. अचानक गाय मोठ–मोठ्यानं हंबरायला लागली. तिला चारा पाणी घातलं पण ती काही खात नव्हती. तिला गोंजरलं तरी शांत होत नव्हती. तिचे हंबरणे चालुच होते. आता तर जवळ–जवळ दोन तास होत आले होते. वातावरणात तिच्या हंबरण्याचा कर्कश आवाज पसरला होता. आम्हा सर्वांना आता कळलं की तिचे वासरु तिला दिसत नाही आहे. ती सर्वत्र आजुबाजूच्या परिसरात फिरली. जायची, पुन्हा यायची, तिची ती एकसारखी तगमग बघून घरच्यांनीही वासराला शोधायला सुरुवात केली. त्या वासराला कोणाच्याही मागे जायची सवय असल्याने ते हरवले होते आणि आईपासून वेगळे झाले होते. सर्वांनाच काळजी वाटत होती वासराची आईच्या दुधाशिवाय कसे राहील ते ! दिवस मावळतीला येत होता आणि गाईचे हंबरणे वाढत होते, तिच्या डोळ्यात अश्रू वाहत होते. आता मात्र आम्ही सर्वांनी देवाला प्रार्थना केली तेवढ्यातच एका व्यक्तीने निरोप आणला. ते पिलु गावाच्या बाहेर त्या व्यक्तीला दिसले होते. तेव्हा घरच्यांनी जाऊन त्या वासराला घरी आणले आणि तेव्हाचा तो क्षण बापरे ! त्या दोघांनी पण एकमेकांकडे धाव घेतली आणि गाईच्या आनंदाला तर जणू उधाण आले होते, ती वासराला गोंजारु लागली. आम्हा सर्वांना ते पाहून गहिवरुन आलं कारण आईची ती माया सर्वत्र पाझरत होती. त्या दिवशी कळलं जगात आईची माया, आंईचं प्रेम कधीही विकत घेऊ शकत नाही. आईसारखं प्रेम जगात कुठेही नाही. म्हणून आई ही महत्वाचीच असते मग ते प्राणी असो, पक्षी असो किंवा माणूस असो. आई ही शेवटी आईच असते. म्हणून आईसारखे दैवत अवघ्या त्रैलोक्यात नाही यावर ग. दी माडगुळकरांची कविता महत्वाची वाटते –

आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही
म्हणून श्रीकाराच्या नंतर शिकणे अ, आ, ई
मुलांनो अ, आ, ई

आई ही अप्रतिम आहे म्हणून अशा आईला कधीही विसरु नये. तिच्या संस्काराचा उपयोग करुन खूप मोठं व्हावे, थोर सत्पुरुष व्हावे व तिचे ऋण फेडावे.

नकोस विसरु ऋण आईचे स्वरुप माऊली पुण्याईचे
थोर पुरुष तु करुन तियेचा होई उतराई

असे हे आईचे वात्सल्य मुक्या प्राण्यात सुद्धा आहे. शेवटी ती आईची माया असते म्हणूनच वेदांना, उपनिषदांना सुद्धा हेच सांगावे लागते –

मातृ देवो भव ।।

संतांनी सुद्धा हेच सांगितलं की, आईवडिलांची सेवा करावी, त्याला देव घरीच भेटेल. त्याच्या घराचच तीर्थ होईल त्याला तिर्थाटन करण्याची आवश्यकता राहणार नाही. तु. म. म्हणतात –

माय बाप केवळ काशी । तेणे न जावे तीर्थांशी ।।

इतकी ताकद आईच्या प्रेमात असते. आणि हिच जाणीच प्राण्यांमध्ये सुद्धा असते. आणि आपण अशा प्राण्यांची जेव्हा हत्या करतो तेव्हा त्या माऊलीला काय वाटत असेल ? ती आपल्या भावना व्यक्तही करु शकत नाही. मुलांना घडवणारी आईच असते. शिवाजी महाराजांना घडवणारी जिजाऊच होती. आई स्वतः संघर्ष करते व आपल्याला वाढवते म्हणून तिचे उपकार कधी विसरु नये. हाच धडा या घटनेतून मिळाला.

कु. नेहा सावरकर
बी. ए. द्वितीय

## माय माझी

आभाळात वीज कडाडली आणि धडकी भरल्यासारखं वाटलं. आभाळ काळेकुट्ट व्हायला लागले होते. जोराने वाहणारा वारा अधिकच वेगाने वाहू लागला होता. तसा अंधारही व्हायला लागला होता. रोजीपाण्याची माणसे धडपडीने घराकडे जाण्यास निघाले असतांना माय अजुनही आली नव्हती. तिच्या काळजीमध्ये आम्ही सर्व भावंडे मातीने लेपलेल्या झोपडीवजा घराच्या वळणीत मायच्या दिशेने डोळे लावून बसलो होतो.


आज बुधवार होता. गावचा आठवडी बाजाराचा दिवस. महिनाभराच्या हजार रुपयातून मालकिनीकडे मागितलेल्या 100 रुपयात माय आठवड्याचा बाजार आणायला गेली होती. माय दुरुनच येतांना दिसताच आम्ही भावंडे उठलो. चुलीवर तिच्यासाठी काळा चहा ठेवला होता. चुलीतली लाकडे विझवून आम्ही भावंडे तिच्याकडे धावत सुटलो. तिच्या थकलेल्या देहाच्या स्पर्शाने दिवसभराची तरतरी आत्ता कुठे आमच्या भावंडांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

जिलेबी, भज्याची पुडी आमच्या हातामध्ये देऊन चहा पित असताना तिच्या चेहऱ्यावर थकलेपणाचा लवलेशही दिसत नसायचा. पाच-सहा घरी भांडे धुण्याचे, फरशी पुसण्याचे काम करुनही आजपर्यंत तिने स्वतःसाठी काही घेतलेले नव्हते. अंगात कधी ताप भरला असतांनाही तिने कामावर कधी सुट्टी घेतली नाही. आमच्या शिक्षणासाठी व घरखर्चासाठी तिची होत असलेली दगदग पाहून माझी कालवाकालव व्हायची. काळा चहा बशीत ओतून पितांना दिवसभराची सगळी शीण विसरुन माय आम्हा भावांकडे पाहून हसत राहायची.

तिच्याकडे पाहून मन लहानपणातल्या आठवणीत कुठेतरी हरविल्यासारखे वाटते. मला चांगले आठवते की, माझ्या लहाणपणी वडील दारु पिऊन मायला शिव्या द्यायचे, खुप मारायचे, ती ओरडायची, रडायची पण तिच्या मदतीला कोणीच येत नव्हते. माय एकटीच रडत बसायची. डोळ्यातले पाणी पुसून माय आम्हाला जेवण वाढायची. दिवसभर कष्ट करुनही वडिलांकडून होणारी मारझोड असे असतांनाही आमच्या चिमुकल्यांच्या तोंडात घास भरवतांना माय हसतच राहायची. सगळे आठवून डोळ्यांत पाणी आले तर बाहेर काळेकुट्ट झाले होते. चुलीवर भाताचे आंदण ठेवून माय बाजेवर विसावा घेत असायची. जन्मभराच्या कितीतरी असंख्य वेदना काळजात दडवून माय हसतच असायची.

"सदा राहील तुझ्या कष्टाची जाण  
वाटावा नेहमी तुझा अभिमान,  
जगामध्ये सर्वात महान,  
थोर अशी माय माझी".

कु. प्रिया मांढरे  
बी. ए. तृतीय



## आई

गंध तुझा रंग माझा फुलासोबत येऊ दे ।  
आई तुझ्या प्रेमाच्या सावलीत मला  
फुलपाखरासारखे येऊ दे ।  
पुढच्या आयुष्यात पुन्हा एकदा जन्म  
तुझ्या पोटी घेऊ दे ।  
सौभाग्य कन्यादानाचे तुझ्या व बाबांच्या  
हातून होऊ दे ।

विशाखा भिवनकर  
बी. ए. द्वितीय

## स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या



१९ व्या शतकात ज्ञानज्योत पेटविणारी पहिली स्त्री म्हणजे सावित्रीबाई. आजच्या स्त्रीमुक्ती आंदोलनाची चळवळीची मुहुर्तमेढ त्यांनीच रोवली. सावित्रीबाई व ज्योतिबा फुले हे दांपत्य दीन दलितांसाठी व स्त्रियांसाठी चंदनाप्रमाणे झिजली.

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव, जि. सातारा येथे झाला. खंडोजी यांची सावित्री ही मुलगी. सावित्री हे पहिले अपत्य. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' अशी म्हण आहे. याप्रमाणे भावी आयुष्यातील समाजसेवेचे व पुढारीपणाचे धडे सावित्रीबाईंनी आपल्या माहेरीच गिरवले होते, असे म्हणावयास हरकत नाही. ज्योतिबांचा जन्म १८२७ चा. त्या काळात गोविंदरावांनी, ज्योतिबांच्या वडीलांनी त्यांचे लग्न बालपणीच करुन दिले. लग्नाच्या वेळी ज्योतिबांचं वय अगदी १३ वर्षांच होतं आणि सावित्रीबाईंची ७ वर्षे. ज्योतिबांनी जिद्दीने आपला अभ्यास पुढे सुरु ठेवला. आणि सावित्रीबाईंना अहमदनगर येथे शिक्षणासाठी पाठविलं. त्यांना तेव्हा समाजाच्या जहरी टिकेला तोंड द्यावे लागले.

१ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ज्योतिबा आणि सावित्रीबाईंनी पहिली मुलींची शाळा सुरु केली. मुलींच्या शिक्षणाची सुरुवात होणं, या क्रांतिकारी बदलामुळे हे पर्व जगाच्या इतिहासातील एक महत्वाचं वर्ष ठरलं. सावित्रीबाई शाळेत शिकवायला जात. त्यांचा जाता–येतांना छळ होई. या शिक्षिकेवर चिखल, दगड, धोंडे, निंदा यांचा मारा व्हायचा. सगळा छळ त्या सहन करायच्या. कितीही विरोध झाला तरी त्या डगमगल्या नाहीत. ज्योतिबांनी आपल्या पत्नीच्या सहकार्याने केवळ शाळा सुरु केल्या असे नव्हे तर त्या शाळांसाठी योग्य असा अभ्यासक्रमही तयार केला.

१८७६ आणि १८९६ अशा दोन वेळेला महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला होता. १८७६–७७ मध्ये दुष्काळात ज्योतिरावांबरोबर सावित्रीबाईंनी फार मोलाची कामगिरी केली. सत्यशोधक समाजामार्फत ठिकठिकाणी छात्रालये उघडून २००० मुला मुलींची या ठिकाणी जेवणाची व्यवस्था केली. या सर्व छात्रालयांचा कारभार सावित्रीबाई पाहात होत्या.

सावित्रीबाई एक बुध्दिमान लेखिका व प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. त्यांचा हा गुण अनेकांसाठी अपरिचित राहिला. स्त्रीशक्ती जागृत केल्याशिवाय स्त्रीमुक्ती शक्य हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आणि म्हणूनच सावित्रीबाई या भारतातील स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रेषित व प्रणेत्या होत्या. काव्यफुले, बावनकशी, सुबोध रत्नाकार हे सावित्रीबाईंचे साहित्य. त्याची प्रेरणाही त्यांना पतीकडूनच मिळाली. त्यांच्या अनेक कवितांतून त्यांचे निसर्गप्रेम व भावसौंदर्य व्यक्त होते. निसर्गाचे सुक्ष्म निरिक्षणही त्यात दिसून येते. अंतःकरणात उसळणाऱ्या दलितप्रेमाच्या लाटा, तळागाळातील माणसांविषयीचे प्रेम त्यातून व्यक्त करतांना शब्दांची रचना त्यांनी योग्य प्रकारे केली आहे. विधवांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठीही फुलेंनी प्रयत्न केले. दुर्बलांना सबल करुन त्यांना समान संधीच्या वाटेवर आणून सोडले. आजच्या पिढीला हे जीवन आदर्श व प्रेरणादायी बनलं. म्हणूनच महात्मा ज्योतिराव फुले हे युगपुरुष आणि सावित्रीबाई फुले या युग स्त्री ठरतात. १८९७ साली महाराष्ट्रात प्लेगची मोठी साथ पसरलेली होती. सावित्रीबाईंनाही प्लेगचा प्रादुर्भाव झाला. आणि १० मार्च १८९७ रोजी या युग स्त्रीचे महानिर्वाण झाले ही क्रांतिज्योति मावळली. अशी ही सावित्रीबाई फुले आपल्या जगाला ज्ञानाकडे वळविणारी पहिली स्त्री म्हणजे आपल्याला ज्ञानामृत करुन देणारी अशी ही महाराष्ट्रातील एक सावित्रीबाई.

अंकिता भोयर

बी. ए. प्रथम

## गुरुशिष्याचे नाते

गुरुशिष्यांचे नाते हे आई–मुलांसारखे असते. आईला जसं आपल्या मुलांची काळजी राहाते तसेच गुरुलाही आपल्या शिष्याच्या भवितव्याची काळजी असते. गुरु हे आपल्या शिष्यावर अनेक प्रकारे कृपा करीत असतात. प्रत्येक व्यक्तिला आपल्या यशासाठी गुरु करावा लागतो. गुरुशिवाय परमेश्वराची भेट होणे कठीण आहे. कारण गुरुंची सेवा जर आपण मनोभावे केली तर आपली भक्ती गुरुलाही आवडते आणि देवालाही आवडते. गुरु हे आपल्या शिष्याचे हित जपत असतात, त्यांना ते सत्य मार्गावर चालायला शिकवितात.

अत्यंत प्रतिभाशाली, प्रज्ञावंत, त्रिकालदर्शी असे थोर गुरु आणि त्यांचे तितकेच महान शिष्य यांची अनेक उदाहरणे आपणांस ज्ञात आहेत. आपल्या सद्गुरुंचे व्यक्तिमत्व, त्यांचे ज्ञान, अलौकिक लोककल्याणकारी असे उद्धारक विचार, त्यांची तत्वप्रणाली, त्यांची विज्ञान प्रचिती आणि आत्मप्रचिती याबद्दल शिष्यांच्या मनात अपरंपार व अविचल श्रद्धाभाव, परमविश्वास, पराकोटीची निष्ठा असेल तर गुरुशिष्याचे नाते हे मायलेकरांच्या नात्यापेक्षाही श्रेष्ठतर स्तरावरील बनते. परिणामतः मातेचा तिच्या अपत्यांवर आणि अपत्याचा मातेवर जसा अधिकार असतो तसेच ते शिष्य हे अधिकारी शिष्य होतात; पण हा अधिकार गाजविण्यासाठी नसतो, तर सद्गुरुंचे कार्य, त्यांचे जनोद्धारक विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी असतो एवढे समजण्याइतपत त्या शिष्यांची आध्यात्मिक प्रगती झालेली असते.

सद्गुरुंच्या रुपात परब्रह्मस्वरुप असे गुरुतत्व विलसत असते म्हणजेच सद्गुरु शरीरधारी असतात. त्यामुळे ते एका वेळी एका ठिकाणच्याच लोकांशी संवाद साधू शकतात. या आधुनिक विज्ञान युगात मात्र ते एकाच वेळी करोडो लोकांशी संवाद साधू शकतात. परंतु प्रत्यक्ष भेटून होणारा संवाद व दूरदर्शन, भ्रमणध्वनी यांच्या माध्यमातून होणारा अप्रत्यक्ष संवाद यात भावनात्मक फरक असतोच ! नाही का ? तळहातावर हापूस आंब्याचे चित्र असणे व प्रत्यक्ष मधुर चवीच्या हापूस आंब्याचे फळ असणे या दोहींच्या अनुभूतीमध्ये फरक असतोच ना ! तसेच हे असते. असो ! गुरुशिष्यांचे नाते निर्माण होण्यासाठी दोहींची भेट होणे गरजेचे असतेच, नाही का ! त्यातही सद्गुरुंना सुपात्र शिष्य लाभणे आणि शिष्याला गुरुप्रचिती, विज्ञानप्रचिती आणि आत्मप्रचिती असणारे सद्गुरु लाभणे हा केवळ अमृतयोग असतो.

मगध साम्राज्याचा सम्राट धनानंद का अत्यंत क्रूर, अन्यायी राजा होता. त्याने प्रकांडपंडित अर्थतज्ञ, राजनीती, युध्दनीती निपुण अशा आर्य चाणक्यांचा भर दरबारात थोर अपमान केला होता. अशा अन्यायी, अत्याचारी, दुराचारी राजांच्या हाती सत्ता असणे राष्ट्रहिताचे नाही, हीं गोष्ट आर्य चाणक्यांनी अचूक हेरली व त्या सम्राटाला पराभूत करु शकेल, असा शिष्य त्यांनी परिश्रमपूर्वक घडविला आणि धनानंदाची सत्ता उलथवून टाकली. तो शिष्य म्हणजे चंद्रगुप्त मौर्य होय. गुरु आपल्याला कोणत्या कार्यासाठी घडवित आहेत ही गोष्ट ओळखण्याची क्षमता शिष्यामध्ये हवी हेच या दृष्टांतातील तात्पर्य होय. आध्यात्मिक गुरु शिष्यांना आध्यात्मिक साधना करावयास शिकवितात. त्या अभ्यासामुळे, साधनेमुळे शिष्यांचे मन खंबीर व निर्भय बनते आणि बुध्दी स्थिर होते. विचारांना स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे असे शिष्य आपल्या प्रापंचिक जीवनात तसेच सार्वजनिक जीवनात अचूक निर्णय घेतात. परिणामतः त्यांचे कल्याण होते. गुरुशिष्यांचे नाते परस्पर पूरक असते. त्या दोहोंचा सह्योग परस्परांसाठी निवार्यच असतो. महाभारत काळातील युध्दाच्या वेळी इच्छामरणाचे वरदान असलेले पितामह भीष्म, कौरव–पांडवांचे गुरु द्रोणाचार्य प्राणपणाने पांडवांविरुद्ध लढले पण आपल्या शिष्योत्तम महारथी अर्जुनाच्या माध्यमातून ते असत्याच्या विरोधात लढत होते. शरीराने ते कौरवांच्या पक्षात होते ; पण मनाने ते पांडवांच्या पक्षातच होते.

संत कबीर यांनी त्यांच्या एका दोह्यात म्हटले आहे की,

कुंभै बांधा जल रहै, जल बिन कुंभ न होय ।
ज्ञानै बांधा मन रहै , मन बिनु ज्ञान न होय ।।

अर्थात मडक्याच्या आधाराने त्यात पाणी साठविता येते. परंतु फक्त माती घेऊन कुंभ म्हणजे मडके तयार करता येत नाही. त्या मातीत पाणी मिसळल्याशिवाय मडके बनू शकत नाही. त्याप्रमाणे मन नसले तर ज्ञानार्जन होऊ शकणार नाही आणि चंचल मनाला स्थैर्य प्राप्त करुन देणे ज्ञानाशिवाय शक्यच नसते. गुरुशिष्याचे नाते असेच परस्पर पूरक असते. शिष्याशिवाय गुरुत्वाला पूर्णत्व नसते, तर गुरुशिवाय शिष्य ज्ञानी होऊ शकत नाही.

धनेश संदोकर
बी.ए. प्रथम

## लोकशिक्षक गाडगेबाबा



भारताची भूमी ही संत, सत्पुरुषांनी आपल्या कर्मयोगाने प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी चंदनापरी झिजून सद्विवेक अमृत सिंचून पुनीत बनविली आहे असे म्हणणे गैर होईल काय ? त्यांनी निसर्गाची उत्कृष्ट निर्मिती मानवजाती मध्ये मानवता रुजविण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसलेत. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मानवाची सेवा केली. त्या कर्मयोगी महामानवात लोकशिक्षक गाडगेबाबा मुकुटमण्यासमान विराजमान आहेत. त्यांनी देव, दैव, नशीब, भाग्य, जादुटोणा आणि चमत्कार गैर मानले. त्यांनी साधुसंत कोणाला म्हणावे, ते कसे ओळखावे, हे जनलोकास त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत पटवून सांगितले.

"जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले,
ज्यासी अपंगिता नाही, त्यासी धरी जो हृदयी ।
दया करणे पुत्रासी, तोंचि दासा आणि दासी,
तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ।।"

ही संत वचने लोकांना पटवून देत असत.

संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ साली अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव येथे झाला. त्यांच्या वडीलांचे नाव झिंगराजी जानोरकर आणि आईचे नाव सखुबाई जानोरकर होते. गाडगेबाबांचे कुटुंब शेणगाव येथे राहात असे. गाडगेबाबांचे वडील झिंगराजी हे जातीने परीट असून त्यांचा व्यवसाय उच्चवर्णियांकडे कपडे धुणे हा होता. परंतु त्यांच्याकडे चांगला जमीन–जुमला होता. ते अडल्या–नडलेल्यांना नेहमी सहकार्य करीत असत. ते सण–उत्सवांत सढळ हाताने खर्च करीत. त्या काळी जन्म, लग्न अशा कार्यक्रमांत समाजबांधवांना कोंबडी, मटण आणि दारुचे आचमन अशी प्रथा होती. तेव्हा झिंगराजींनी बाळाच्या बारश्यात बाळाचे नांच डेबू ठेवले. पुढे त्यांचा देवभोळेपणा, अज्ञान, व्यसनाधीनता , निरक्षरता यामुळे त्यांना दारिद्र्य आले. 1884 साली गाडगेबाबांच्या वडीलांचा मृत्यु झाला. सखुबाईने हंबरडा फोडला तेव्हा ८ वर्षाचा डेबू आईला बिलगून आक्रोश करु लागला. त्यानंतर डेबू आपल्या मामाकडे राहू लागला. डेबू बालपणीपासून जिज्ञासु, चिकित्सक, सत्यवचनी, प्रामाणिक आणि आज्ञाधारक होता. त्याला लहानपणापासून दारिद्र्य, अस्पृश्यता, चटक्यांनी हैरान केले होते. डेबूचा विवाह त्यांच्या मामांनी कुंतीबाई नावाच्या मुलीसोबत थाटात लावून दिला. डेबूच्या कष्टामुळे चंद्रभान मामाची भरभराट झाली. लोक त्यांना चंद्रभानऐवजी चंद्रभानजी म्हणू लागले त्याचे डेबूला फार समाधान वाटे. पण त्यांचे मन संसारात रमत नसे. समाजातील अन्याय, अत्याचार, कुप्रथा, अज्ञान, रोगराई, दारिद्र्य, चोरी, दंगे, शोषण पाहून त्यांचे हृदय हेलावून जाई. त्यांनी काम, क्रोध, राग, द्वेष, मद, मोह या षड्रिपूंना स्वतःपासून दूर पळविले. सन १९०५ ला घरची मंडळी झोपी गेली असता हातात काठी घेऊन फक्त अंगावरील कापडनिशी ते घरापासून दूरवर निघून गेले. वेड्यापरी सतत १२ वर्षे फिरुन महाराष्ट्रासह अनेक राज्ये त्यांनी पायतळी घातलेत. तेथील लोकजीवन, चालीरिती, सामाजिक, धार्मिक समज, गैरसमज, वंश, भाषा यांचा सूक्ष्म अभ्यास केला. १९२७ रोजी अंगात ठिगळांचे, रंगीबेरंगी वस्त्र, खांद्यावर गोंधडी, डोक्यावर खापरी, हाती गाडगे व काठी, आणि काखेत खराटा असा वेश धारण करुन त्यांनी लोकसेवेला प्रारंभ केला. कोणत्याही गावी जाणे, सकाळी खराट्याने गावातील गल्ली झाडून घाण काढून टाकणे आणि रात्री त्याच गावात कीर्तन करुन त्यामध्ये स्वच्छतेच्या महत्वापासून मानवी मनातील विकृती, अज्ञान, अंधश्रद्धा, कुप्रथांची घाण साफ करण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांना प्रचंड त्रास व यातना भोगाव्या लागल्या असतील. खरं तर कीर्तनात श्रोत्यांना 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या गजरात गुंतवून त्यांना मायेचा, प्रेमाचा व जिव्हाळ्याचा संदेश देत.

"मायबाप हों, प्राण्यांची हत्या करु नका, खोटे बोलू नका, चुगली करु नका, चोरी करु नका, व्यभिचार करु नका, दारु अफू या व्यसनांपासून दूर राहा, सट्टा खेळू नका, अस्पृश्यता पाळू नका, स्त्री–पुरुष विषमता पाळू नका, लग्नाप्रसंगी हुंडा घेऊ नका, कर्ज काढून लग्न, सण, उत्सव साजरे करु नका, कोणाचा विश्वासघात करु नका, आजारापासून मुक्त होण्यासाठी डॉक्टरजवळ जा, बुवा, भोंदूवर विश्वास ठेवू नका, वृध्द मायबापांचे पालनपोषण करा व सेवा करा, आपल्या मुला मुलींना भरपूण शिक्षण द्या, आपले गांव स्वच्छ ठेवून आजारमुक्त राहा, सर्वांसोबत मैत्री बंधुभावाने वागून आपल्या गावात शांती, समाधान, समृद्धी नोंदवा असे गाडगेबाबा हे आपल्या भजनात लोकांना सांगत असत.

"गाव समृध्द तर देश समृध्द हे भाकीत स्मरणात ठेवा. सण, उत्सव, लग्नाप्रसंगी अन्नाची नासाडी होऊ देऊ नका" असा तुकोबा माऊलींचा संदेश आहे. "मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे कारण", हा गुरुमंत्र प्रत्येकाने सतत ध्यानी ठेवावा. आपण लोकशिक्षक गाडगेबाबा यांचा संदेश आपल्या जीवनात अंमलात आणला पाहिजे.

अश्विनी दिघोरे
बी. ए. द्वितीय

## आचरण

या नेत्रांनी आपण हे जग जेव्हा बघतो तेव्हा या जगात वावरणारी माणसे आपल्याला दिसतात. प्रत्येक व्यक्ती हा त्याच्या स्वभावामुळे, संगतीमुळे वेगळा भासतो. कारण जीवनात संगत महत्वाची आहे. चांगल्या संगतीत राहिल्याने चांगलच होते. कारण एखाद्या व्यक्तीच्या सवयींचा, संगतीचा परिणाम हा दुसऱ्याच्या व्यक्तिमत्वास प्रभावी करु शकतो. म्हणून तर वाईटाच्या संगतीने वाईट तर चांगल्याच्या संगतीने चांगलच घडतं.

ढेकणाच्या संगे हिरा दुभंगला ।
कुसंगे नाडला सुधा जैसा ।।

संत तुकाराम महाराज म्हणतात, ढेकुणाच्या सहवासात राहिला तर हिरा सुद्धा दुभंगून जातो त्याचप्रमाणे कितीही मोठा साधू असला तरी तो वाईट संगतीने नाडला जाऊ शकतो हे जगाचे सत्य आहे. म्हणून आपण सुद्धा सदाचरणी असलो पाहिजे. कारण माणसाचे मोठे पण पैशाने नाही तर स्वभावाने, सद्वर्तनाने शोभून दिसत असते. खरी श्रीमंती पैशात नाही तर आपल्या सद्विचारात असते.

एखादा व्यक्ती खूप शिकला, मोठा झाला पण आचरणाने वाईट असेल तर आपण त्याला वाईट ठरवतो. कारण माणुसकीच्या नात्याने त्याचे ते आचरण योग्य नसते. त्या विरुद्ध जर एखादी व्यक्ती अडाणी असेल पण संस्कारी असेल, आई–वडीलांची सेवा करणारा असेल तर लोक म्हणतात, 'कसाही असला तरी माणूस स्वभावाने चांगला आहे'. हे कशामुळे तर स्वभावामुळे, कारण प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव हा त्याचा आरसा असतो व संस्कार हे त्याला चमकवणारे औषध असते म्हणून संस्कार महत्वाचे. माणुसकी महत्वाची, दया, प्रेमभाव महत्वाचे. जोपर्यंत हे तत्व शिल्लक आहेत तोपर्यंत जग आहे नाही तर सर्वत्र अराजकता माजेल हे शाश्वत सत्य आहे. ह्याच मार्गाचा पुरस्कार सर्व महान मंडळींनी केला. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी समाज परिवर्तन घडवून आणले ते सदाचरणी होते. समाजाने त्यांना विरोध केला पण शेवटी एकटे असून परिवर्तन त्यांनीच घडवून आणले. आज संपूर्ण समाज त्यांच्या पाठिशी आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज ज्यांना तत्कालिन समाजाने त्रास दिला तरीही त्या माऊलीने आपले कर्म योग्य रित्या केले.

त्याच समाजाच्या उद्धारासाठी ज्ञानेश्वरी लिहिली. तेच ज्ञानेश्वर महाराज वयाच्या 16 व्या वर्षी जगताचे 'माऊली' झाले. ही ताकद असते. सद्वर्तनावर चालत असतांना कितीही कठोर प्रसंग आले तरी हा मार्ग सोडू नये. कारण हाच मार्ग शाश्वत असून याच मार्गातून खरे सुख आणि खरा आनंद मिळणार आहे.

कु. नेहा सावरकर
बी. ए. द्वितीय



## बाबासाहेब The Greatest Indian

बाबासाहेब तुमच्यामुळे वाढली आमुची शान
आज जगतो तुमच्यामुळे करुनी वरती मान

गुलामगिरीतून बहुजनांना बाहेर काढून केले कल्याण
असे लिहून संविधानात वाढविला भारतीयांचा स्वाभिमान
महाडच्या तळ्याचे पाणी पिऊन क्रांती केली ती महान
नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे खुले करण्याचे ते आव्हान

स्वार्थाने तुम्ही कधीही जगले नाही
कुणापुढेही तुम्ही कधीही झुकले नाही

रात्रंदिवस अभ्यास करुनही तुम्ही कधीही थकले नाही
एक रुपयासाठीही कधी कुणापुढे झुकले नाही

स्पृश्यतेचा बंड करण्यासाठी तुम्ही उठले
चातुर्वर्णाची गुलामगिरी तोडण्यासाठी तुम्ही झटले.

असे किती सांगायचे "बाबासाहेब' तुमचे उपकार
तुमच्या लेखनीतून झाला भारतीयांचा उध्दार

तुमच्यामुळेच आमची राहणीमान बदलली
आणि देशात महिला पंतप्रधान झाली.

## आनंदाचे झाड

"संपलेल्या वर्षाला निरोप देतांना काय येतय मनात ? काहीच छान घडलं नाही असं, की बरेच काही चांगले घडेल. आता अजुन काही फार चांगलं घडेल ? आपण काय नेणार नव्या वर्षात सोबत ?"

बघता बघता अजुन एक वर्ष संपलं. अशी कितीतरी वर्ष संपत असतात. नवीन येत असतात. आपण संपलेल्या वर्षात काय काय केलं याच्या आठवणी काढत राहातो. येणाऱ्या वर्षाची तारीख लिहिण्याचा सराव करावा लागतो. मनातल्या मनात जन्माला आलेला प्रत्येकजण दरवर्षी करत असतो. शरीरातल्या पेशी झिजत असतात. अनुभवाने शहाणपण वाढत असतं. चारचे चौदा पावसाळे होतात. वर्ष येत असतं, जात असतं.

नवीन वर्षात काय दडलेलं कुठे माहीत आहे कोणाला ? आयुष्य काय वाढवून ठेवणार आहे पुढ्यात, कशा कशाचा सामना करावा लागणार आहे, कशाचा आनंद मिळणार आहे आणि समाधान नेमकं कशात दडलय हे कोणाला माहीत असतं, संपलेल्या शेवटच्या दिवसापर्यंत. तसे तर वर्ष संपल्यानंतरही आणि नविन वर्षाची सुरुवात झाल्यानंतरही कुठे कळतं आपल्याला नक्की काय होणार आहे ?

तरीही अशा विलक्षण अनोळखी काळात आपण आनंदाचं पाऊल ठेवतो, उमेदीनं नव्या वर्षाचं स्वागत करतो आणि एका साहसाला दरवर्षी सुरुवात करत असतो.

शोध, कुतुहल आणि साहस ही माणसांची गरज असते. अन्न, वस्त्र, निवाऱ्याइतकेच ते महत्वाचे असते. नुसतं पोट भरुन चालत नाही, नुसतं छप्पर मिळवून भागत नाही. मग शोध सुरु होतो स्वतःच्या परिसराचा, परिघाचा. त्यात असणाऱ्या आणि नसणाऱ्या गोष्टींचा. हा शोध आपल्या श्वासासारखा निरंतर चालला तर गंमत आहे. जे नाही त्यांचा शोध. जे घडण्याची शक्यता आहे त्याचा शोध, जे हवय त्याचा आणि जे नकोस त्याचाही !

गमतीचा भाग हा की शोध कधीच संपत नाही. थांबत नाही. कॅलेंडरही बदलत राहाते. आताही आपले कॅलेंडर बदलणार आहे. नवीन वर्षाला सुरुवात होणार आहे. नवीन वर्षाच्या जल्लोषात स्वागत करायचं असं प्रत्येकांना वाटत असते. पण त्याचबरोबर आपण आपल्यात काय बदल घडवून आणू शकतो याचा विचार आपल्याला कदाचित नव्या शोधाकडे घेऊन जाईल.



आजुबाजुला बघितलं की आपापल्या समजुतींना, श्रद्धांना, समज–गैरसमजांना कवटाळुन बसलेली माणसे दिसतात. आपल्याला जे समजलय त्यापलिकडेही बरच काही समजुन घेण्याची आवश्यकता असते. आपल्याला जे पटलय त्या पलिकडे काहीतरी असते ते समजून घेता येऊ शकते जे माणूस म्हणून आपल्याला समृद्ध करते. या प्रवासाला अंत नाही.

या प्रवासाला अंत नाही पण हा प्रवास अतिशय रोचक आहे, आकर्षक आहे, त्यात आनंद आहे, एवढं तरी आपल्या मनाशी असावं ........

अनेकदा आपण आपल्याच मुलभूत भावना, आनंद, निराशा, प्रेम, राग, मत्सर समजून घ्यायलाही कमी पडतो. आपल्या प्रत्येकाची नाती, आपले काम, आपले वैयक्तिक आणि व्यावहारीक आयुष्य, आपला दृष्टीकोन, आपल्या महत्वाकांक्षेचा आढावा, इच्छाशक्ती, त्याचं तीव्र असणं – नसणं, आपण स्वतःवर प्रेम करणं, न करणं, इतरांना समजुन घेणे किंवा समजुन न घेणे, कष्ट करण्याची आपली तयारी असणे–नसणे आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे आपल्या भाव–भावना.

वर्षानुवर्षे मनाच्या कुठल्याशा कोपऱ्यात पडून राहणाऱ्या भावना. त्या भावनांची ओझी आपण वागवतो की, भावनांचं नियोजन आपल्याला करता येतं या सगळ्यावर आपलं यश–अपयश, आपल्या स्वभावाचे विविध पैलु आणि आपले भावविश्व अवलंबून असते.

निराशेचे क्षण, येतातच ...... येणारच !

त्यावेळी वाटतं कुठाय आनंद ?

पण आनंदाच्या शोधात पायपीट करत असतांना आपण विसरुनच जातो की आनंदाच्या झाडाचे बी आपल्याच मनात, भरलेले असते. त्याला पालवी मात्र तेव्हाच फुटते जेव्हा आपण स्वतःत डोकावून बघतो. सरत्या वर्षाला निरोप घेताना त्या आनंदाच्या क्षणांना वेचू, त्यांचे आभार मानू, त्यांना सोबत घेऊ ......

आणि निघू नव्या वर्षात

यश, आनंद आपली वाट पाहात आहे ......

कु. प्रिया मांढरे
बी.ए. द्वितीय

## "देशाला युध्द नको बुध्द हवा"

दि. १४ मार्च २०१९ हा दिवस देशाला हादरा देऊन गेला. या दिवशी ७९ गाड्यांमध्ये जवळपास २७४१ जवान / सैनिकांचा जम्मु वरुन श्रीनगरला काफिला जात होता. अचानक सुरक्षेला चकमा देऊन "जैश – ए – मोहम्मद" या आतंकवादी संघटनेच्या अतिरेकी ३५० RDX (विस्फोटक) भरुन जवानांच्या काफिल्यावर हल्ला चढवितो. काफिल्यामधल्या एका गाडीला ३५० RDX असलेली गाडी सैनिकांच्या गाडीला धडक मारते व ४० पेक्षा जास्त सैनिक शहीद होतात. तसेच काही सैनिक गंभीर जखमी होतात. १४ मार्च २०१९ ला झालेल्या पुलवामा मध्ये हल्ल्यात सैनिकांना वीरमरण आले. या अतिरेकी हल्ल्यात कुणाचा भाऊ, कुणाचा नवरा, कुणाचा मुलगा तर कुणाच्या वडीलांना वीरमरण आले. सैनिकांच्या परिवारावर दुःखाचे डोंगर कोसळले. याच हल्ल्यामुळे देशात होत आलेला अतिरेकी हल्ला कधी मुंबई तर कधी दिल्ली तर कधी जम्मु–काश्मीर यांपासून भारतीय नागरीक त्रस्त झाले. अशाप्रकारचे आतंकवादी हल्ले पाकिस्तान हा ISI व जैश–ए–मोहम्मद" च्या मदतीने भारतावर करत आला आहे. पुलवामा हल्ल्यात पाकिस्तानचा हात आहे असे भारतीय लष्करप्रमुख व भारतीय नागरिक सुदधा म्हणतात. नेहमीच्याच अशा हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला. पाकिस्तान करीत असलेल्या हल्ल्यात आतापर्यंत हजारो सैनिकांना वीरमरण आले तसेच नागरिकांना सुदधा जीव गमवावा लागला. या हल्ल्यांचा ब्रदला म्हणून भारतीय राजकारणात व भारतीय नागरिकांमध्ये युध्दाची लाट पसरली आहे. जो–तो व्यक्ती भारत–पाकिस्तानच्या युध्दाची भाषा करत आहे. भारतीय नागरिकांमध्ये पाकिस्तान विरुदध अत्यंत क्रोध आहे आणि या क्रोधाचं उत्तर 'युदध' आहे असं नागरिक म्हंणतात. पण या परिस्थितीत युध्दाची समस्या निर्माण करणे योग्य आहे का ? युध्दांमुळे परिणाम काय होतील ? युध्दाचे तोटे काय असतील ? युध्दामुळे सगळ्या समस्यांचे निवारण होईल का ? अशा अनेक प्रश्नांचे उत्तर शोधायला हवे.

६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९४५ चा दिवस आठवून सगळ्यांना भीती वाटते. हे दिवस जगाला हादरा देऊन गेलेत. अमेरिकेने दुसऱ्या महायुध्दात जापानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर परमाणु बॉम्ब टाकले. या हल्ल्यात एक लाख चाळीस हजार पेक्षा लोक मृत्युमुखी पडले व परमाणु बॉम्बच्या रेडिएशन मुळे काही लोक पागल झालेत. या हल्ल्याने अनेक लोकांच्या शरीरावरची चमडी नाहिसी झाली. सर्व जमीन नापीकीची झाली. दोन्ही शहरांत प्रेताचा ढेर साचून होता. म्हणून जापानने अमेरिकेंच्या समोर शरणागती पत्करली. ६ ऑगस्ट व ९ ऑगस्ट ला 'काळा दिवस' म्हणून ओळखला जातो. युध्दजन्य परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून 'संयुक्त राष्ट्रसंघ' अमेरिकेच्या न्युयॉर्क शहरामध्ये स्थापन झाले. या करारनाम्यात १९२ देशांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या.

नागरिकांच्या तणावामुळे भारतीय प्रधानमंत्री यांनी पाकिस्तानला धडा शिकविणार असे भाष्य केले. त्यावर पाकिस्तानच्या प्रधानमंत्र्यांनी उत्तर देतांना म्हटले की " भारत आमच्यावर हल्ला करील तर आम्ही पण उत्तर देऊ. "

| भारत | पाकिस्तान |
|---|---|
| १४ लाख सैनिक | ६.३७ लाख सैनिक |
| ८०४ लडाकू विमान | ४१० लडाकू विमान |
| १४ युध्दपोत | १० युध्दपोत |
| १६ सबमरीन | ५ सबमरीन |
| १३० परमाणु बॉम्ब | १४० परमाणु बॉम्ब |

भारतीय नेते व नागरिकांनी युध्दाचे तोटे लक्षात घ्यायला पाहिजे कारण "युध्द केल्यामुळे फायदे कमी तोटेच जास्त होतात. आजचे युग आधुनिक युग आहे. प्रत्येक देश शक्तिशाली तंत्र, शस्त्र विकसित करण्याचा प्रयत्न करतो. या आधुनिक युगामध्ये युध्दाची भाषा किती हानिकारक आहे हे लक्षात घ्यायला पाहिजे.

पुलवामा हल्ल्याचा बदला म्हणून पाकिस्तानशी युध्द केले तर पाकिस्तान नेस्तनाबुत होईल मात्र भारताचे नुकसान देखील खूप प्रमाणात होईल. दोन्ही देशाचे सैन्य मृत्युमुखी पडतील. हजारो करोड जमीन बंजर होईल. पाण्याची टंचाई, भुकमारी, हजारो तंत्राचे नुकसान होईल. युध्दासाठी करोडो रुपये खर्च करावे लागेल, लोकांची भटकंती सुरु होईल, आर्थिक सामाजिक समस्या निर्माण होईल. आजच्या युगातील युध्द म्हणजे करोडो लोकांची हत्या, करोडो लोक बेघर होतील. पृथ्वीच्या विनाशाचे कारण निर्माण होईल. जागतिक पातळीवर येण्यासाठी दोन्ही देशांना


वर्षानुवर्षे लागतील. म्हणून युध्द करणे हे कोणत्याही हल्ल्याचे कारण नाही.

पुलवामा येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात सैनिक शहीद झाले याचे मला खूप वाईट वाटते. याची मी निंदा करतो. मात्र दहशतवाद संपविणे हे एका देशाचे काम नाही तर सगळ्या देशांनी एकत्र कार्य करुन ह्या अतिरेकी संघटनांचा खात्मा करायला हवा. संयुक्त राष्ट्र संघाने दोन्ही देशामधला ताण–तणाव कमी केला पाहिजे. आतंकवादाचा खात्मा केला पाहिजे. स्वाक्षऱ्या केलेल्या देशांनी तसेच इतर देशांची सुद्धा संयुक्त राष्ट्र संघाच्या नियमांचे पालन करायला पाहिजे. नियमांचा, शांततेचा भंग झाल्यास त्या देशाला शिक्षा द्यायला हवी. विविध देशांवर नियंत्रण ठेवावे. पृथ्वीच्या संरक्षणकरीता सर्व देशांनी योग्य कार्य करावे.


आजच्या युगामध्ये युध्द करणे म्हणजे करोडो लोकांचा बळी घेणे, सर्व नेस्तनाबूत करणे होय म्हणून देशांना "युध्दं नको बुध्द हवा' आहे.

मिथून दूपारे
बी. ए. द्वितीय





## शेतकऱ्यांच्या आत्महत्येला विराम कधी लागेल ?



हडप्पा संस्कृतीला भारतातील फार प्राचीन संस्कृती समजली जाते. ह्या संस्कृतीमध्ये शेती व्यवसाय हा प्रजेचा मुख्य व्यवसाय होता. शेती व्यवसायाला जोड म्हणून शेळ्या मेंढ्या पाळल्या जात. शेती हा प्रमुख व्यवसाय असून गहू, जव किंवा बार्ली मुख्य धान्य होते. शेती व्यवसाय प्रमुख असल्यामुळे प्रजा अत्यंत सुखी होती. पुढे काही शतकानंतर भारताला कृषीप्रधान देश म्हणून ईतर देश ओळखू लागले. मात्र २१ वे शतक हे शेतकऱ्यांसाठी ग्रहण ठरले. या शतकात शेती व्यवसायाची व शेतकऱ्यांची कायापालट झाली. एका पाठोपाठ एक अशा प्रत्येक दिवसाला शेतकऱ्याची आत्महत्या होऊ लागली. वर्तमानपत्रात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या वाचले की मनाला धक्काच बसतो.

२१ वे शतक हे आधुनिकी करणासाठी प्रसिध्द आहे. नव–नवीन तंत्राचा उपयोग करुन कठीण काम सोपे होऊ लागले. मात्र शेतकऱ्यांसाठी ते बिनकामी ठरलं. शेतकऱ्यांजवळ पाहिजे तेवढा पैसा उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी अश्या यंत्राचा लाभ घेऊ शकत नाही. सरकारने राबविलेल्या योजनांचा लाभ घेणे शेतकऱ्यांसाठी अवघड झाले आहे. सरकारच्या योजनेचा लाभ प्रत्येक शेतकऱ्याला मिळेल याची शाश्वती कुणीच देऊ शकत नाही. म्हणून शेतकरी सावकाराकडून व्याजाने पैसे काढून शेतीची मशागत, पेरणी करतो. सरकारने बँकेद्वारे शेतकऱ्यांची मदत म्हणून कमी व्याजाने पैसे देऊ केले आहे. ह्याला कर्ज सुद्धा म्हणतात. पण बँकेद्वारे कर्ज घेण्याची पध्दत शेतकऱ्यांसाठी फायदेमंद ठरत नाही. बँक ही आखलेल्या नियमानुसार शेतकऱ्याच्या कागदपत्राची योग्य पडताळणी करुन बँक योग्य पडताळणी करुन कर्ज देते. ह्या पध्दतीला फारच कालावधी लागतो. म्हणून शेतकरी सावकाराकडे जाऊन कर्ज घेतो. व शेतीची कामे पार पाडतो. शेतकऱ्याला शेतीची मशागत, पेरणी, नांगरणी, खुरपणं, औषधांची फवारणी, पिकाचे संरक्षण, पिकाला पाणी देणे, पिकाची कापणी करणे व पिकाचे उत्पन्न घेणे अशा कठीण समस्यांसाबत शेतकऱ्यांना आपल्या परिवाराचा सांभाळ करावा लागतो. मुलांचे शिक्षण, आई–वडीलांचा सांभाळ, त्यांचे आजारपण अशा अनेक जबाबदाऱ्या सांभाळतांना त्यांना कर्ज घ्यावे लागते हे कर्ज परतफेड करण्यासाठी शेतकरी धान्य बाजारात विकायला नेतो. मात्र व्यापारी वर्ग सरकारने ठरविलेल्या धान्याच्या शिफारस मुल्यापेक्षा शेतमाल खरेदी करुन शेतकऱ्यांची पिळवणूक करत असतात. धान्याच्या किंमती अर्ध्या किंमतीत घेऊन व्यापारी वर्ग धनवान बनतो व शेतकरी गरीब. शेतकऱ्याला योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकरी स्वतःच्या कर्जाची परतफेड करु शकत नाही. आणि त्यामुळे नैराश्येमध्ये जाऊन तो आत्महत्येसारखे पाऊल उचलतो.

परंतु सरकारने भरपूर योजना आखून त्यांच्या कर्जबाजारीवर नियंत्रण मिळविले आहे. त्यामुळे आत्महत्या न करता शेतकऱ्यांनी या योजनांचा उपयोग करावा. सरकारने पण दुष्काळ पडल्यास त्यांना नुकसान भरपाई द्यावी. नवीन तरुणांना शेतीविषयक प्रेरणांतून जागरुक करावे. त्याला कर्जबाजारीपणाला लढण्यासाठी सामर्थ्य हवे असते.

गेल्या चार वर्षात महाराष्ट्रामध्ये १२,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. ही खुप धक्कादायक बाब आहे. आत्महत्या करण्यात यवतमाळ जिल्हा अग्रेसर आहे. यवतमाळ जिल्ह्यात २०१३–२०१८ या कालावधीत १६५७ शेतकऱ्यांनी जीवन संपविले आहे. अमरावती जिल्ह्यात १५४१ शेतकऱ्यांनी , बुलढाणा जिल्यात १२७९ शेतकऱ्यांनी, अकोला– ९५३, वाशिम – ५१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. वर्धा जिल्ह्यात गेल्या १४ महिन्यात १०८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.


म्हणूनच सरकारनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी त्यांच्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करावे म्हणजे त्याच्या कुटुंबाला कुठल्याही संकटाशी सामना करावा लागणार नाही.

'शेतकरी सुखी तर प्रजा सुखी'

मिथुन दुपारे
बी. ए. द्वितीय

# 'निर्धार' वार्षिकांक
# इंग्रजी विभाग २०१८ - १९

## विद्यार्थी संपादक



**संकेत साबळे**

## मार्गदर्शक
**प्रा. सोमेश्वर वासेकर**

## MOTHER



**MOTHER** is such
A special word,
The Loveliest
I have ever heard
**MOTHER** is a God
who inspire us
to achieve our goal
My **MOTHER** is my Word
A toast to you
above all the rest
**MOTHER** you are so special
You are simply The Best

Ms. Ashwini Dighore
B. A. II



## HOME

A **HOME** can be made of sticks around
or great big blocks of snow.
A **HOME** can be twenty storeyed tall or in the ground below.
A **HOME** can have a mill above or a chimney on it's side
A **HOME** can be where you're safe and sound
or with family, friends and more.
A **HOME** can be where you have your heart
And all that you adore.

Ms. Ashwini Dighore
B. A. II



## HAPPINESS

Every night, when I go to bed
I used to hold my pillow so tightly
But no matter how much I hold it,
It will never hold me back
I'm not insane to think like that
It's not the pillow that I'm holding
But you Hoping that one night
you'll be there, beside me
and I'll hold you like
I never want to leave you
I do feel lonely most of the time
Even when I'm around people
I feel left out ignored
I feel like I'm a burden But with you
How can I tell you,
You always make me feel special
I feel valued Most importantly
I feel Happy That's why honey

Mr. Sawan Sonwane
B.Sc. I

## PURPOSE



Struggle is the prime purpose of life.
Fight with the problems and be might
Fly in the sky like kite
Your future will be bright.
Be cool, calm and stop the anger
Worry would not bring out of the danger
You would become your own teacher
Only then you will create the Future.

Mr. Manish Shelke
B. A. II

## LIFE GOES ON

Some people are living their desires .......
Some people's life is on fire .......
This cold is so severe ........
The worry and stress are
not going anywhere.
Still nothing changes here ......
Cause the world goes on even if
one dies or one borns somewhere ...

Mr. Sanket Sable
B. A. I






## LIFE

Life is so strange
Nothing stay the same
everything changes
But who to blame ?
Life is game
where you have to lose
before you can gain
to win you have to face
The fearful rain
In life they always say
don't use your heart
only use your brain
In the life there is a love
but more is the head
No one decide they all
he states and who knows the fate
The closest people you need go way
when you need them the most
you find them lost
day after day, days go by
people are burn and other die
year after year no one understand
nothing is clear
nothing in our heart except fear.
Today you walk and talk
tomorrow you lay in your grave
and nothing it gone
The money that you save
and no use for your gold
when it won't be sold
you have to be strong
stop doing wrong
and never lie
be ready for your last
GOOD BYE.







Ms. Pushpa Sandesh
B.Sc. III

## GOOD THOUGHT

Life is the facebook, people shall like your problems and comment, but no one will solve them because everyone is busy updating theirs.

The most useful asset of a person is not a need full of knowledge but heart full of love, with ears open to listen and hands willing to help.

Time is like a river. You cannot touch the same water twice, because the flow that has passed will never pass again. "Enjoy every moment of your life."

Humanity is greater that status.



Beauty attracts heart but your character attracts soul.

Happiness is not getting all you want. It's enjoying all you have.

The best way to earn respect is to treating others with respect.

Silence and smile are two powerful tools. Smile is the way to solve many problems and silence is the way to avoid many problems.

Good friends care for each other, close friends understands each other but true friends stay forever. Beyond words, beyond distance and beyond time.

Respect is for those who deserve it, not for those who demand it.



Mr. Mithun Dupare
B. A. II

## COMPUTER TRICK TO ROTATE MONITOR SCREEN

This trick usually freaks people out.
It is an amazing trick that I like doing.
You can use to turn your screen upside down.
Hold Ctrl + Alt + the arrow keys.
Use it to freak you friends out.



shutterstock.com • 300266366

Mr. Akshay Nagose
B. Voc. - I

## MINIMIZE ALL PROGRAMS OF COMPUTER TRICK

**Do you have a lot of programs running and you want to minimize all go to the desktop but you don't want to be clicking around minimizing all of them one after the other ?**

**It can be a pain in the ass if the programs are marry, I know that.**


**Use windows key + D to minimize all the whole programs at once.**

**You can also use windows key + M but the difference is that windows D maximize the programs again if you press it twice.**

**Windows M will only minimize all the programs but cannot maximize them back.**

**Sahil Khobragade**

**B. Voc. - I**



## New Hardware technology in Windows 10 PCs

**The arrival of Windows 10 later this year could uses in more convient, fun and wire free PC computing. Windows PCs, which still make up the vast majority of desktop & laptop machines. The new Windows Hello features which will allow users to unlock a Windows 10 device by recognizing a face, iris or fingerprint could bring 3D cameras and more sensors to PCs.**

1) **Wire-free computing - Wireless charging by Wi-Fi**
2) **Sensors - It detects the positions of PCs**
3) **Better performance - Working well with skylake chips.**
4) **Face recognition- Recognize face to Log user in Windows.**
5) **Advanced displays - OLED Screens**
6) **Hardware upgrades - Windows 10 PCs could pack graphics card that support Direct x 12 which will improve PC gaming.**

**Mr. Aniket Tijare**

**B. Voc. - II**

## Data Security Techniques : Lock a Folder with Password

All of us have some files and folders that we consider private. They can be anything from our business documents to pictures of friends and family. These are files that we don't want other people using our computer to know about. As windows offers no way to protect our private information, most of us get in awkward situations when these files are discovered by unwanted people.

You can store this information in a hidden folder. The only problem is that anyone can easily search the contents of a hidden folder using windows search itself.

Folder Protector offers each user a protected folder that can only be opened by entering the password in folder protector. Unlike most security programs, Folder protector is small in size (nearly 58 KB) and does not show the folder that it is protecting. This given an additional advantage that people who don't know the password do not have a target to try and hack their way into. As the software is portable, you can hide it or even delete it after protection your folder and no one will have a clue that it was used. Then whenever you need to access protected files, you can re- download the program from this page : enter the password and access your protected files.

Rupali Bhoge

B.Voc.

## Cloning Software

Cloning Software is a range of tools designed to make a complete copy of a hard drive to an image file. This copy can be used to duplicate the contents of a hard drive to the some computer or to a new computer. The cloned disk is a bit for bit copy.

There are major uses for cloning software. Companies can load a standard image with the operating system and applications and depoly it to all computers using a clone server. If the hard drive is being upgraded to a larger one, all the information can be copied to the image for restoration after the new drive is installed. A computer that is sold or given to a new users can be reloaded with an image without the previous user's file.

Software for Cloning : Clone ·zilla Acronic Software.

Roshan Mangar

B. Voc. I

## Lock your computer without moving your mouse in seconds ?

Use the Windows key plus L key.

This is useful when you don't want someone to see what you are doing and the person.

Just use the trick and Voila your screen is Locked.

Please don't use your computer for bad things there are a lot of good ways of using it.


Mac users can use this trick by holding Command + Option + Power

You can replace Power with Eject if you like.

Mr. Dhiraj Jangale

B. Voc. - I

## MYCOTOXIN




A mycotoxin is a toxic secondary metabolite produced by organisms of the fungus kingdom and is capable of causing disease and death in both humans and other animals.

The term 'Mycotoxin' is usually reserved for the toxic chemical product produced by fungi that reading colonize crops.

Examples of Mycotoxins causing human and animal illness include aflatoxin, citrinin, Fumonisins, ochratoxin A, Patulin, trichothecenes, zearalenone, and ergot alkaloids such as ergotamine.

One mold species may produce many different mycotoxins, and several species may produce the same mycotoxin.

Most fungi are acrobic and are found almost everywhere in extremely small quantities due to the diminute size of their spores.


They consume organic matter wherever humidity and temperature are sufficient.

Where conditions are right, fungi proliferate into colonies and mycotoxin levels become high.

Ochratoxin is a mycotoxin that comes in three secondary metabolite forms A, B and C.

Minal Raghute
B. Voc. I

## NANOTECHNOLOGY



What is Nanotechnology ?

Nanotechnology is Science, Engineering, and technology conducted at the nanoscale, which is about 1 to 100 nanometers.

Physicist Richard Feynman, the Father of Nanotechnology.

Nanoscience and Nanotechnology are the study and application of extremely small things and can be used across all the other Science fields, such as Chemistry, Biology, Physics, materials Science and Engineering.

Although modern nanoscience and Nanotechnology are quite new, nanoscale materials were used for centuries.

Alternate-sized gold and silver particles created colors in the stained glass windows of medieval churches hundreds of years ago.

These are currently being tested, but brown says that the experimental food packaging has been successful in lab setting.

If you want to know which comapines are using nanotech in their food or packaging, check out the user maintained.

Basically you can put this yummy blob into the microwave and specify what you'd like it to be.

The biggest potential use for this method involves improving the nutritional value of foods.

Ms. Shubhangi Wanjari
B. Voc. - I

## HUMAN NUTRITION

Human nutrition, process by which substances in food are transformed into body tissues and provide energy for the full range of physical and mental activities that make up human like. The study of human nutrition is interdisciplinary in character involving not only Physiology, Biochemistry, and Molecular and Anthropalogy, which explore the influence of attitudes, beliefs preferences and cultural traditions on food choices.

This article covers the major issues of human nutrition. Such as energy generation and balance essential nutrients and recommended dietary guidelines. For a full length treatment of health problems created by failure in nutrition, see nutritional disease.

The human body can be thought of as an engine that releases the energy present in the foods that it digests. This energy is utilized partly for the mechanical work performed by the muscles and in the secretory processes and partly for the work necessary to maintain the body's structure and functions.



## WATER HARVESTING

Water harvesting is the allunmulation and storage of rainwater for reuse on - site, rather than allowing it to run off. Water can be collected from rivers or roots, and in many places the water collected in redirected to a deep pit (well, shaft or borehole) aquiter a reservoir with percolation or collected from dew or fog with nets or other tools. Its uses include water for gardens.

Rainwater harvesting is one of the simplest and oldest methods of self supply of water for households usually financed by the user. The Greek island of crets is also known for its use of large cisterns for rain. Water collection and storage during the minoan period from 2,6000 BC-1, 100 BC. Around 300 BCF , farming communities in Balochistan (now located in Pakistan)



## Library Committee Report

During the Academic year 20018-19 more than 1000 Text books and Reference books were procured. Digitization of the library is in progress. There are 7 computers in the UGC Network Resource Centre. All the Computers are working properly and have the internet facility. All the students (Senior, Junior & Post Graduate students) are taking the benefit of the UGC Network Resource Centre. In addition to routine library functions earmarked by the library committee, library has organized many programmes like Library Orientation, book exhibition etc..

During the academic year 2018-19 Challenging questions contest was conducted in the College premises. More than 100 students participated in the contest. Prizes were distributed in the annual day function.

A Book exhibition was organized on2nd and 3rd February, 2019,during the occasion of State Level Economics Conference organsied by the Vidharbha Arthasasthra Parishad at BMV, Bhiwapur . Faculties and students of Economics from various universities visited in large numbers. A Book exhibition was organized from 11th& 12th March,2019, with the book contributed by staff/Teachers and the exhibition was a huge success. Students and public from the Bhiwapur area visited in large numbers.

On 13th to 19th August, 2018 Central Library had conducted One Week Library Orientation Programme for all the students and faculties. The Chief guest of the seminar was Dr.(Mrs.) Aswini Paradkar, Librarian, St. Francis de Sales College, Nagpur. Dr. Jobi George, Principal, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, presided over the function. Dr. Sunil Shinde, Associate Professor, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Dr. Mangesh Kadu, Assistant Professor, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur, Dr. Motiraj Chavhan, Assistant Professor, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur and Mrs. Rajasree O.P., Librarian, Library and Information Centre, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur were present on the Dias. During the One Week Orientation Programme Book Review was conducted for the students. Around 1000 students participated in the Orientation Programme.

**Rajshree o. p.**
Librarian



# मराठी विभाग
## वार्षिक अहवाल (२०१८-२०१९)

मराठी अभ्यास मंडळाच्या वतीने सत्र २०१८–२०१९ या शैक्षणिक सत्रात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे–

**१. मराठी अभ्यासमंडळ कार्यकारीणीचे गठन:–**

दि. १६ ऑगष्ट २०१८ ला मराठी विभागाच्या माध्यमातून मराठी अभ्यास मंडळाच्या कार्यकारीणीचे गठन करण्यात आले. यावेळी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. राहील कुरैशी, प्रा. सोमेश्वर वासेकर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजय दिघोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली बी. ए., बी. कॉम व बी.एस.सी.च्या विद्यार्थ्यांमधून सत्र २०१८–१९ करीता मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष व सहा सदस्यांची निवड करण्यात आली. मराठी अभ्यासमंडळ गठन करण्यामागील भूमिका व महत्व तसेच मराठी अभ्यास मंडळातील कार्यकारीणीचे कार्य या सर्वांची माहिती मराठी विभाग प्रमुख व मंडळाचे मार्गदर्शक डॉ. मधुकर नंदनवार यांनी विशद केले. प्रा. सोमेश्वर वासेकर यांनी अभ्यास मंडळाच्या माध्यमातून भाषा विषयाची माहिती दिली. मराठी विषयाची व्याप्ती व व्याकरणाचे महत्व मराठी भाषेसाठी कसे महत्वाचे आहे हे सांगून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धात्मक परीक्षेच्या दृष्टिने मराठी विषय कसा महत्वाचा आहे हे समजावून सांगीतले. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रणित ठाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच कार्यकारीणीचे सचिव कु. अश्विनी दिघोरे हीने आभार मानले.

**२. मराठी अभ्यासमंडळ उद्घाटन कार्यक्रम :–**

दि. ३० ऑगष्ट २०१८ ला मराठी विभागाच्या माध्यमातून मराठी वाङ्मय अभ्यास मंडळाचे उद्घाटन मा. डॉ. राजेंद्र आर. वाटाणे, मराठी साहित्यिक तायवाडे कॉलेज, कोराडी यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, विशेष अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. राजेंद्र जाने कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी, तसेच प्रमुख उपस्थितीत डॉ. सुनिल शिंदे, मराठी विभाग प्रमुख व मार्गदर्शक डॉ. मधुकर नंदनवार प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी दिप प्रज्वलन व माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन तसेच माल्यार्पण करण्यात आले. मराठीच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्याचे स्वागत शब्द सुमनाने केले. यात्रसंगी पाहुण्याचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यांचा परिचय व अभ्यास मंडळाचे महत्व मार्गदर्शक डॉ. मधुकर नंदनवार यांनी करुन दिला.

भिवापूर महाविद्यालयात शिकत असलेल्या बी.ए. भाग १,२ व ३ च्या विद्यार्थ्यांनी मराठी विभागाच्या द्वारे मार्गदर्शक डॉ. नंदनवार यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी बनविलेल्या भिंतीपत्रक प्रदर्शनीचे उद्घाटन डॉ. राजेंद्र आर. वाटाणे, यांच्या हस्ते संपन्न झाले. या भिंतीपत्रक प्रदर्शनीमध्ये प्राचिन मराठी आद्य गद्यग्रंथ 'लीळाचरित्र' व आद्य पद्यग्रंथ 'विवेकसिंधु' तील मराठी साहित्यापासून, मध्ययुगीन संतसाहित्य संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम, आधुनिक संत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा व आधुनिक कवी, लेखक, नाटककार, कादंबरीकार व साहित्यिक केशवसुत, कुसुमाग्रज, कवी नारायण सुर्वे तसेच विद्यार्थ्यांनी रचलेल्या स्वलिखित कवितांची ओळख व विद्यार्थ्यांची मराठी साहित्या बद्दलची आवड निर्माण करण्याचे कार्य निश्चितच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून या भिंतीपत्रक प्रदर्शनीतून करण्यात आले आहे असे उद्गार डॉ. राजेंद्र वाटाणे सरांनी आपल्या अभिप्रायामधून व्यक्त केले. तर प्राचार्य डॉ. राजेंद्र जाने यांनी यात्रसंगी ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मराठी साहित्याची जाणीव व्हावी म्हणून अशा आगळ्या वेगळ्या भिंतीपत्रक प्रदर्शनीचे आयोजन मार्गदर्शक डॉ. नंदनवार यांनी केल्या बद्दल हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून असे उपक्रम गौरवास्पद असल्याचे सांगून कौतुक केले.

उद्घाटक व वक्ते डॉ. राजेंद्र आर वाटाणे यांनी आपल्या वक्तव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात मराठी ही आपली मातृभाषा आहे, तीचे महत्व सांगताना भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य घटक असून भाषा संवाद व्यवहाराचे माध्यम असल्याचे प्रतिपादन केले व जगाच्या पाठीवर सहा हजार भाषा असल्याचे सांगीतले. बोलीभाषा व प्रमाणभाषा पैकी २००० बोली आज बोलल्या जातात त्यामुळे आपल्याला प्रमाण मराठी भाषा येणे गरजेचे असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी आपल्या जिवनात प्रामाणिकपणा व सातत्य टिकविणे आवश्यक आहे त्यासाठी दुसऱ्याचा विश्वास संपादन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. कोणतीही भाषा ही उच किंवा निच नसते आपली माय मराठी आपल्यासाठी सर्वोत्तम आहे तिचा आदर करा जपणूक व संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. ती कधिही नष्ट होणार नाही. जवळपास आठशे वर्षापासून मराठी भाषेवर अनेक भाषेचे आक्रमण झाले, अनेक भाषेचे शब्द मराठीने स्विकारले तरीही मराठी भाषा आज समृध्दतेने आपले आस्तित्व जोपासून आहे. मराठी साहित्याचे दालन इतर भाषेच्या

दालनापेक्षा भरीव असल्याचे डॉ. वाटाणे यांनी सांगताना विद्यार्थ्यांनी मराठी आपली मातृभाषा आहे आपण तिच्यावर प्रेम करायला पाहीजे असे मत यावेळी व्यक्त केले.

मराठी वाङ्मय अभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी यावेळी विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील मराठी भाषा कशी सौंदर्याने युक्त आहे हे सांगतांना मी १९९० पासूनच मराठी भाषा अनुभवत असल्याचे सांगीतले. महाराष्ट्राची संस्कृती व मराठी भाषा विशेषतः पुण्याची मराठी भाषा किती गोड आहे तिच्यात साखरेची गोडी असून तेथील लोकांचे मराठी भाषेवर प्रभूत्व असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनीही मराठी भाषेवर प्रभूत्व असू द्यावे असे विचार आपल्या अध्यक्षिय भाषणातून डॉ. जोबी जॉर्ज यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक व सुत्रसंचालन कु. नेहा सावरकर हिने तर आभार प्रदर्शन कु. अश्विनी दिघोरे हिने मानले.

**दि.२७/२/२०१९कवी कुसुमाग्रज जन्मदिन 'मराठी भाषादिन' कार्यक्रमः**—दि.२७/२/२०१९ कवी वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन 'मराठी भाषादिन' म्हणून महाविद्यालयात वरिष्ठ विभागात घेण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदनवार यांनी मराठी भाषेचे महत्व व मराठीची अस्मिता जपण्याचे काम आपणा सर्वांचे असल्याचे विद्यार्थ्यांना सांगीतले कवी कुसुमाग्रजाच्या जयंतीचे महत्व आपण जोपासले पाहीजे असे विशद केले. मराठी अभ्यास मंडळ सहसचिव कु. नेहा सावरकर हिने संत ज्ञानेश्वरांनी 'माय मराठीला 'माझे मराठीचिये बोलू कौतुके। परी अमृतासही पैजा जिंके' या ओवीचा अर्थ विद्यार्थ्यांना सांगून ज्ञानेश्वर माऊलीने मराठी भाषेला कसे सर्वसामान्यापर्यंत पोहचविले याची खात्री पटवून दिली. मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रणित ठाकरे यांनी संचालन व आभार व्यक्त केले.

**निबंध स्पर्धेचे आयोजनः**— दि. ५/३/२०१९ ला महाविद्यालयात वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यासाठी मराठी विभागातर्फे निर्धार वार्षिकांकांच्या विद्यार्थी सहसंपादक निवडीसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. मराठी 'दहशतवाद एक जागतीक समस्या' व इंग्रजी Teririsom is a World Problem या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत एकूण १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कु. नेहा सावरकर बी.ए.२ व अश्विनी दिघोरे बी.ए. २ या विद्यार्थीनींनी क्रमांक पटकावला. यांची विद्यार्थी सहसंपादक पदी निवड करुन निर्धार वार्षिकांकात स्थान देण्यात आले.

**कविता (काव्य) लेखन स्पर्धेचे आयोजनः**—

दि. २५/३/२०२० रोजी वरिष्ठ विभागात विद्यार्थ्यांची निर्धार वार्षिकांकासाठी काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आली. या काव्यलेखन स्पर्धेत वरिष्ठ विभागातील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. काव्य लेखन स्पर्धेतील योग्य अशा कवितांना निर्धार वार्षिकांकात स्थान देण्यात आले. काव्य लेखन स्पर्धेतील कवितांचे परीक्षण मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार यांनी केले.

अशा प्रकारे मराठी अभ्यास मंडळाच्या वतीने सत्र २०१८—१९ या शैक्षणिक सत्रात विविध उपक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या.

**डॉ. मधुकर नंदनवार**
**मराठी विभाग प्रमुख**






# अर्थशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल सत्र २०१८–२०१९

भिवापूर महाविद्यालयाची स्थापना सन १९९० मध्ये झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये अर्थशास्त्र हया ऐच्छिक विषयाचा समावेश आहे. २००२–२००३ पासून महाविद्यालयामध्ये एम. ए. अर्थशास्त्र हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. अर्थशास्त्र विषयाला पदवीमध्ये १७० आणि पदव्युत्यरला ३० विद्यार्थी प्रवेशित आहेत. अर्थशास्त्र विभागामध्ये १९९४ पासून डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे हे विभागप्रमुख म्हणून नियमित स्वरूपात कार्यरत आहेत. डॉ. सुनिल शिंदे हे २००० पासून तर २०१० पर्यंत ज्योतीबा फुले समाज कार्य महाविद्यालय, उमरेड येथील समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे कार्य केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली २० विद्यार्थ्यांनी संशोधनाचे कार्य पुर्ण केलेले आहे. २०१० पासून डॉ. सुनिल शिंदे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ, नागपूर आचार्य पदविसाठी मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५ विद्यार्थ्यांनी आचार्य पदविसाठी नोंदनी झाली आहे. २ विद्यार्थ्याला आचार्य पदवी प्राप्त झाली असून १ विद्यार्थ्याचे शोधप्रबंध विद्यापिठाला सादर झालेले आहे. डॉ. सुनिल शिंदे यांनी विद्यापिठ अनुदान आयोग यांच्या अनुदानातून ग्रामिण महिलांच्या आर्थिक विकासात बचतगटाची भुमिका आणि महत्व (भिवापूर तालुक्यातील महिलांच्या विशेष संदर्भात )या विषयावर लघुशोध प्रबंधाचे कार्य पुर्ण केले असून डॉ. सुनिल शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील ५३ शोध निबंध सादर केले आहेत.


अर्थशास्त्र विभागाद्वारे २ आणि ३ फेब्रुवारी २०१९ ला भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR) आणि भिवापूर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २ आणि ३ फेब्रुवारी २०१९ दोन दिवसीय विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आलेले होते. दिनांक २ फेब्रुवारीला या अधिवेशनाचे उद्घाटन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलिधर चांदेकर यांच्या हस्तेपारपडले. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणविस, ४३ व्या अर्थशास्त्र परिषदेचे नियोजित अध्यक्ष डॉ. राजेंद्र भांडवलकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ॲड. पद्माकरजी अग्रवाल, मुख्य अतिथी




डॉ. विनय बाबर, परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. अंजली कुलकर्णी, स्वागताध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज परिषदेचे आयोजक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनिल शिंदे चर्चासत्र समितीचे प्रमुख डॉ. मोतिराज चव्हाण परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. मनिष कायरकर, नागपूर विभागाचे सचिव डॉ. विठ्ठल घिनमिने अमरावती विभागाचे डॉ. राजेश चव्हाण उपस्थित होते.

सत्र २०१८–१९ मध्ये दिनांक २ ऑक्टोंबर २०१९ ला महात्मा गांधी जयंती दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयामध्ये प्रवेशित प्रथम वर्षातील विद्यार्थ्यासाठी 'स्वागतसमारंभ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांना स्वाध्याय आणि संशोधन लेख लिहिण्याच्या दृष्टीने अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यासाठी ओपन व्हायवा आणि चर्चासत्राचे आयोजन.करण्यात आले होते. शेवटी पदवी आणि पदव्युत्तर परिक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी व्हावी याकरिता 'विद्यापिठ परीक्षा पध्दतीचेस्वरूप' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागप्रमुख
डॉ. सुनिल शिंदे



# इतिहास विभाग

## अहवाल सत्र 2018–2019

इतिहास विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्र २०१८–१९ या वर्षात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल खालील प्रमाणे

इतिहास अभ्यासमंडळाचे कार्यकारिणीचे गठन:–

दिनांक २० ऑगस्ट २०१८ ला इतिहास विभागाच्या माध्यमातून इतिहास अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. तसेच अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुनिल शिंदे व मराठी विभागाचे विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. मोतीराज चव्हाण यांनी इतिहास अभ्यासमंडळाची भुमिका विशद केली. डॉ. सुनिल शिंदे तसेच डॉ. मधुकर नंदनवार यांनी इतिहासाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

**इतिहास अभ्यास मंडळ उद्‌घाटन कार्यक्रम :–**

स्थानिक भिवापूर महाविद्यालय भिवापूरमध्ये इतिहास विभागाच्या माध्यमातून इतिहास अभ्यासमंडळाचे उद्‌घाटन मा. डॉ. श्याम कायंदे, सेवानिवृत्ती प्राचार्य प्रताप कॉलेज अमळनेर जि. जळगांव यांच्या हस्ते संपन्न झाले. या कायक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्रमुख वक्ता म्हणून डॉ. श्शामराव कोरेटी, सहयोगी प्राध्यापक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर तसेच प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. नरेश मडावी इतिहास विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली तसेच विशेष उपस्थितीत डॉ. सुनिल शिंदे व इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रारंभी माता सरस्वती व स्व. भाऊसाहेब मुळक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत स्वागत गीतानी केले. याप्रसंगी पाहुण्याचा शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास अभ्यास मंडळाची अध्यक्षा कु. रचना नंदेश्वर यांनी केले. प्रास्ताविकातून मागील वर्षी झालेल्या कार्यक्रमाची रूपरेषा विषद करून यावर्षी होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती तिने दिली. याप्रसंगी पाहुण्यांची समायोचित भाषणे झाली. त्यात प्रा. नरेश मडावी इतिहास विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रा. डॉ. शामराव कोरेटी यांनी इतिहासावर प्रकाश टाकतांना म्हटले की, इतिहास हा स्मरणावर आधारित सामाजिक शास्त्र आहे. इतिहास हा करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण विषय आहे. इतिहासामध्ये सध्या कार्पोरेट



हिस्ट्री हा नविन विचारप्रवाह प्रचलित असून त्याला विशेष महत्व आलेले आहे. यशाचा फॉर्मुला तुमच्या जवळ आहे.

स्थानिक इतिहासाशिवाय देशाचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. इतिहास हे सामाजिक शास्त्र असून त्याचा संबंध विज्ञान व इतर विषयाशी येतो. डॉ. श्याम कायंदे बोलतांना म्हणाले स्थानिक इतिहासाची माहिती जाणून घेतांना तो सामाजिक व सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक तसेच शैक्षणिक इ. दृष्टीने जाणून घेणे गरजेचे आहे. या सगळ्या परिस्थितीची माहिती आपण संशोधनात्मक दृष्टया जर बघितली तर निश्चितच आपला स्थानिक इतिहास समोर येईल. आतापर्यंतचा इतिहासात चरबीचा जास्त वापर केला आहे. परंतु इतिहासाला चरबीची आवश्यकता नाही तर त्याला स्नायुची आवश्यकता आहे.

सत्र २०१७–१८ मध्ये इतिहास विषयात प्राविण्य ( ७५टक्के पेक्षा जास्त ) मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे पाहुण्यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला सत्कार करण्यात आलेल्या विद्यार्थ्यामध्ये कु. नेहा सावरकर, कु. अश्विनी दिघोरे, कु. जयश्री चव्हाण श्री. जगदिश जनबंधू, कु मनिषा लोहारे व कु. सोनाली सोनटक्के यांचा समावेश होता.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी इतिहास विभागाच्या पुढाकाराने महाविद्यालयात ऐतिहासिक संग्रहालय सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच स्थानिक इतिहासाची माहितीविषयी अपडेट राहण्याविषयी सांगितले.

या कार्यक्रमा प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व इतिहासाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण इतिहास विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा कु. रचना नंदेश्वर, उपाध्यक्ष कु. नेहा सावरकर, कु. अश्विनी दिघोरे, कु. कल्याणी मोहोड, कु. विकीता उईके, जयश्री चव्हाण, श्री. जगदिश जनबंधू, श्री. प्रणित ठाकरे, कु मनिषा लोहारे कु. सोनाली सोनटक्के व तसेच इतिहास अभ्यास मंडळाच्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन कु. नेहा सावरकर हिने केले तर आभार कु. अश्विनी दिघोरे हिने मानले.

**प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण**
**इतिहास विभाग प्रमुख**

# भिवापूर महाविद्यालय, भिवापूर
## वाणिज्य अभ्यास मंडळ
## वार्षिक अहवाल सत्र २०१८–१९

२०१८–१९ या सत्रा करिता नवीन कार्यकारिणी निवडण्यासाठी दि. २०/०८/२०१८ ला सभेचे आयोजन करण्यात आले. सभेचे आयोजन करून वाणिज्य अभ्यास मंडळाची स्थापना चालू सत्राकरिता करण्यात आली. कार्यकारिणी निवडण्यात आल्यानंतर नवनियुक्त अध्यक्षांकडे पूर्वनियुक्त अध्यक्षांनी सुत्रे प्रदान केलीत. त्यानंतर पूर्वनियुक्त अध्यक्षांद्वारा वाणिज्य अभ्यास मंडळाच्या स्थापनेची पूर्वकल्पना, उद्देश सांगून राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची कल्पना देण्यात आली. यानंतर नवनियुक्त अध्यक्षांनी आपली अभ्यास मंडळा विषयीची मते सांगून आपले विचार व्यक्त केले. प्रा. डॉ. राजेश बहुरूपी तसेच प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांनी वाणिज्य विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शेवटी नवनियुक्त उपाध्यक्ष कु. सीमा लोणारे हीने उपस्थितांचे आभार मानले.

दि. १ सप्टेंबर, २०१८ ला वाणिज्य अभ्यास मंडळांतर्गत दोन पाहुणे व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. सकाळच्या ११ ते १२.३० या सत्रात **'आधुनिक व्यवसायात टॅलीचे महत्व'** व **'Tally Features & Opportunlities'** या विषयावर सौ. अश्विनी लिचडे, संचालिका सॉफ्टसेन्स टेक्नोसर्व्ह प्रा. लि., नागपूर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात टॅलीची विविध आवृत्ती, कार्य व महत्व समजावून सांगून आधुनिक व्यवसायात लेखांकन प्रक्रियेत टॅलीचे महत्व व गरज पटवून दिली.

१२.३० ते २.०० या दुपारच्या सत्रात **'GST'** या विषयावर मीस मेरी जोसेफ, Head, Tally Institute of Learning, Nagpur यांनी व्याख्यान पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून दिले. या व्याख्यानात त्यांनी टॅलीत 'GST' च्या नोंदी कशा करता येईल या विषयी विविध विंडोजच्या माध्यमातून समजावून सांगून 'एक देश एक कर' ही संकल्पना समजावून सांगितली.


दि. २६.०३.२०१९ ला **'Impact of IT & ITES in**



© Can Stock Photo - csp34018158

**Indian Economy'** या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. या चर्चासत्रात एकूण २१ विद्यार्थी उपस्थित होते. सदर चर्चासत्रात दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी आप आपली मते व्यक्त केलीत. चर्चा सत्राच्या अध्यक्ष स्थानी प्रा. डॉ. ए. व्ही. महावादीवार उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. कु. वर्षा मेश्राम उपस्थित होत्या. प्रा. वर्षा मेश्राम यांनी ही चर्चासत्र प्रसंगी आपले मत व्यक्त केले. सरते शेवटी अध्यक्षीय भाषणानंतर श्री निखील बल्की या विद्यार्थ्याने उपस्थितांचे आभार मानले. अशाप्रकारे वाणिज्य अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. सदर उपक्रमांच्या यशस्वीतेमागे मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन महत्वाचे ठरते.

प्रा. डॉ. अनिता व्ही. महावादीवार
वाणिज्य विभाग
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर



## परीक्षा समिती

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास व्हावा हे महाविद्यालयाचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांचे भविष्यातील भावी जीवन प्रामुख्याने शैक्षणिक प्रगती वरच अवलंबून असते.

आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मुल्यांकन परीक्षेच्या माध्यमातून केले जाते. ह्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून महाविद्यालयात वेगवेगळ्या परीक्षेचे आयोजन केले जाते. त्याचा उद्देश पुढीलप्रमाणे –

१. सत्रात समितीतर्फे प्रत्येक सत्रात दोन घटक चाचण्या (२० गुण) घेतल्या जातात.
२. विषयाचे प्राध्यापक प्रत्येक पाठावर वेगळी चाचणी घेतात.
३. महाविद्यालयात विद्यापीठ स्तरावर विद्यापीठ परीक्षेआधी सत्र पध्दतीनूसार ८० व ६० गुणांची सराव परीक्षा घेतली जाते. तीन तासात अचूक उत्तरे लिहण्याचा सराव करुन घेणे.
४. घटक चाचणीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना सतत अभ्यासाला लावणे.
५. विद्यापीठ परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांबाबत वर्गात ओळख करुन देणे.
६. वर्गतासात शिकविलेल्या भागावर लहान लहान प्रश्न तयार करुन विद्यार्थ्याकडून उत्तरे सांगण्यास प्रवृत्त करणे.
७. वर्गतासात अकस्मात चाचणी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना अभ्यासात सतत प्रेरीत ठेवणे.
८. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रीका तपासणे, उत्तरपत्रीका तपासणी अंती विद्यार्थी कुठे चुका करतात हे लक्षात आणून देणे व कमकुवत विद्यार्थ्यांना वेगळे मार्गदर्शन करणे.
९. परीक्षेतअधिक चांगले गुण मिळविण्यासाठी योग्य उत्तरे कशी लिहावीत ह्याबाबत परीक्षेपश्चात विषयांच्या प्राध्यापकांकडून मार्गदर्शन करणे.
१०. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनास प्रेरीत करुन इतर स्पर्धात्मक परीक्षेची माहिती देऊन विविध स्पर्धात्मक परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणे.

डॉ. मधुकर नंदनवार
परीक्षा समिती सचिव

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र अहवाल सत्र २०१८–२०१९

स्थानिक भिवापूर महाविद्यालयमध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था करण्यात आली असून विद्यार्थ्यासाठी स्पर्धा परीक्षेला उपयुक्त अशी विविध मासिकें उपलब्ध करून देण्याल आली आहे. या मासिकाचा फायदा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला होत असतो. या अभ्यासिकेचा फायदा महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच शासकीय व निमशासकीय सेवेत कार्यरत कर्मचारीसुध्दा घेत असतात. महाविद्यालयाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची विविध प्रकारची पुस्तके विद्यार्थ्यांना पुरविली जातात. तसेच अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड विविध क्षेत्रात झाल्याचे दिसून आले आहे.

स्थानिक भिवापूर महाविद्यालयामध्ये सत्र २०१८–२०१९ मध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेसंबधी वेगवेगळया विषयतज्ज्ञाच्या माध्यमातून दिनांक ११मार्च ते १६ मार्च २०१९ या कालावधी मध्ये मार्गदर्शन करण्यात आले होते. त्यात इंग्रजी विभागाचे विभागप्रमुख डॉ. राहील कुरेशी यांनी स्पर्धा परीक्षे मध्ये येणाऱ्या व्याकरणाविषयी मार्गदर्शन केले. तसेच श्री. महेश चौधरी यांनी गणित व बँकिग मध्ये येणाऱ्या प्रश्नाचे स्वरूप सांगून त्यावर मार्गदर्शन केले. तसेच श्री.देवेंद्र नागपूरे यांनी अर्थशास्त्र व भूगोल या विषयाचे नियमित वर्ग घेतले. व गिरीश गुप्ता यांनी अर्थशास्त्र या विषयावर मार्गदर्शन केले.

उपरोक्त मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला काही विद्यार्थ्यांनी बँकेची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. भिवापूर महाविद्यालयानी सुरू केलल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा फायदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तसेच परीसरातील माजी विद्यार्थ्यांना मिळत असून अनेक विद्यार्थी या मार्गदर्शन केदातून यशस्वी झालेले आहेत.

डॉ. मोतीराज चव्हाण
कार्यक्रम समन्वयक
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

# आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ सत्र २०१८–१९


आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ यांनी दिलेल्या मार्गदर्शिकेनुसार भिवापूर महाविद्यालय, भिवापूर अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार मंडळाची स्थापना २०१८–१९ या सत्रात करण्यात आली. मंडळाची स्थापना झाल्यानंतर एकूण १७७ विद्यार्थ्यांची नोंदणी विद्यापीठ पातळीवर करण्यात आली. उन्नत प्रकल्पात ६७ विद्यार्थी व १०० विद्यार्थिनी असे एकूण १६७ विद्यार्थी तसेच सहयोग प्रकल्पात एकूण ५ विद्यार्थी तसेच सक्षम प्रकल्पात एकूण १ विद्यार्थी व ४ विद्यार्थिनी अशा एकूण ५ विद्यार्थीचा सहभाग होता. विद्यार्थ्यांची नोंदणी केल्यानंतर सत्र २०१८–१९ या सत्रात विविध उपक्रम राबविण्यात आले.


उन्नत प्रकल्पांतर्गत सर्वप्रथम मंडळाच्या स्थापनेच्या पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना प्रकल्प करण्यास मार्गदर्शन करण्यात आले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांनी तयार करून आणलेल्या प्रकल्पाचे विद्यापीठ पातळीवर मूल्यांकन करण्यास नेण्यात आले. या सत्रात एकूण ८७ विद्यार्थ्यांनी प्रकल्प कार्य पूर्ण केले.

सहयोग प्रकल्पांतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी या सत्रात एकूण दोन कार्यक्रम राबविण्यात आले. सर्वप्रथम भिवापूर येथील प्रभाग क्र. १३ मधील भिमादेवी नवयुवक सेवा मंडळ सभागृह येथे दि. ११.१०.२०१८ ला मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. या शिबीरात एकूण २२ ज्येष्ठ महिला व पुरूषांची आरोग्य तपासणी करून त्यांना उत्तम आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला. या तपासणी शिबिरात डॉ. गुप्ता, डॉ. राऊत, डॉ. खवास, डॉ. हिवरकर, डॉ.अग्रवाल, डॉ. श्वेता गुप्ता इ. तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. दि. १३.१०.२०१८ ला ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या वयात येणाऱ्या विविध आरोग्यविषयक अडचणी कशा सोडवाव्या याविषयी डॉ. श्वेता गुप्ता यांनी प्रभाग क्र. ११ साठी भिमादेवी नवयुवक सेवा मंडळ सभागृह, भिवापूर येथे एकूण ३९ नागरिकांना मार्गदर्शन केले.

अशाप्रकारे आजीवन अध्ययन व विस्तार मंडळांतर्गत या सत्रात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. राबविण्यात आलेल्या महत्वपूर्ण उपक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

प्रा. अनिता व्ही महावादीवार
समन्वयक
आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ



# राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल २०१८-२०१९

दिनांक ०२ ऑक्टोबर १९६९ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात झाली. तेव्हापासूनच महाविद्यालयात ही योजना सुरु झाली. ४७ वर्षांची समृध्द परंपरा असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित उपक्रमांना दर मंगळवार व बुधवारच्या तासांना ०१ ऑगस्ट पासून स्वयंसेवकांची आचारसंहिता, सेवाभाव वृत्ती निर्माण करून युवक-युवतीना यात सहभागी करून घेण्यात येते. नियमित उपक्रमाअंतर्गत श्रमसंस्कार, आरोग्यसेवा, रक्तदान शिबीर, पर्यावरण जनजागृती, बौध्दिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दर मंगळवारी व बुधवारी दुपारी १. ०० ते २.३० या वेळात तास घेतले जातात.

**रासेयो नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा :**

सत्रारंभी नव्याने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकरीता नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत नवीन विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण तर माजी विद्यार्थ्याचे उद्‌बोधन असा दुहेरी हेतू साधला जातो. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, स्वयंसेवकांचे कर्तव्य व आचारसंहिता इत्यादीविषयीचे मार्गदर्शन मा. प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी केले. प्रशिक्षणात माजी विद्यार्थ्यांची अनुभव सांगून नवीन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम केले जातात. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ अनिता महावादीवार यांनी व तसेच डॉ. मोतीराज चव्हाण यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची आचारसंहिता व त्यांचे महत्व विषद करून सांगितले व आतापर्यंत रासेयोची यशस्वी वाटचाल कशी झाली या संदर्भात सर्व इतिहास विद्यार्थ्यांसमोर ठेवला.

**ध्वजारोहण :**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांच्या हस्ते ध्वजारोहण केले . यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. यावेळी मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

**स्वच्छता पकवाडा (१६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट)**

राष्ट्रीय सेवा योजनद्वारा स्वच्छता पकवाड्याअंतर्गत श्रमदानाचे कार्य करण्यात आले. या निमित्त दि. ३० ऑगस्ट, २०१८ ला महाविद्यालयातील रा.से.यो. च्या स्वयंसेवकाना सर्वप्रथम स्वच्छतेविषयी शपथ देण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयीन परिसरात प्रशासकीय इमारतीपासून तर वर्गखोल्यांपर्यंत स्वच्छता करण्यात आली. दि. ३१ ऑगस्ट, २०१८ ला भिवापूर येथील गावामधे ग्रामीण रूग्णालय तसेच गावातील मध्यवर्ती ठिकाण असलेले बसस्टॉप येथे स्वयंसेवकांनी स्वच्छता करून गावातील जनतेत स्वच्छतेविषयीची जाणीव व जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**'स्वच्छता हीच सेवा' पंधरवाडा :**

'स्वच्छता हीच सेवा' हा शासकीय उपक्रम राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा दिनांक १५ सप्टेंबर ते ०२ आक्टो. २०१८ या कालावधीत महाविद्यालयाच्या आजुबाजुचा परीसर व महाविद्यालय ते पोलीस स्टेशन, तालुका आरोग्य प्राथमीक केंद्र, टेलीफोन ऑफीस, नगर पंचायत व मंदिर इत्यादी ठिकानचे गाजरगवत व कचरा साफ करून पंधरवाडा साजरा करण्यात आला.

**रासेयो वर्धापन दिन :**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा ४८ वा वर्धापन युवकांच्या अपार उत्साहात संपन्न झाला.

दिनांक २४/०९/२०१८ ला 'वर्धापन दिनाचा' कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या वर्धापन दिन. सौ किरण नागरीकर, नगरपंचायत अध्यक्ष, नगर पंचायत,

भिवापूर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. . प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. सुनिल शिंदे, डॉ. मंगेश कडू, डॉ. मोतीराज चव्हान यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाविषयीची रूपरेषा सांगितली.

मा. सौ किरण नागरीकर यांनी आपल्या भाषणात युवकांनी समाजाविषयीची बांधिलकी ठेवून आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी समाजातील लोकांचे प्रश्न त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कसे प्रयत्न करायला पाहिजे तसेच गाव व आसपास जवळील परीसर स्वच्छ ठेउन समाजाप्रती हिच सेवा ठरू शकते विषयीचे योग्य उद्‌बोधन केले. उद्‌बोधना बरोबरच भिवापूर गावातील काही समस्यांचेही चिंतन केले. तर प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकांमध्ये जिद्द, चिकाटी असेल तर ते जीवनात ठरविलेले लक्ष्य निश्चितच गाठू शकतील ते समजून सांगण्यासाठी विविध विषयाचा आधार घेवून समजावून सांगितले. डॉ. सुनिल शिंदे यांनी समाजाची व देशाची जडनघडन करण्याचे माध्यम म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकाच्या वतीने दिलेल्या योगदान हिच सेवा ठरते. डॉ. मंगेश कडू यांनी आपल्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व घडविण्याचे कार्य करते याविषयी सांगीतले. डॉ. मोतीराज चव्हान यांनी राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा सांगीतला. या उद्घाटन सोहळ्याचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे साहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मधुकर नंदनवार यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतीनिधी श्री जावेद पठान यांनी आभार मानले.

दिनांक २५/०९/२०१८ ला सकाळी ११.०० ते १.०० या वेळात **'स्वच्छता अभियान'** राबविण्यात आले. महाविद्यालय परिसर तसेच परिसराबाहेरही स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज तसेच प्राध्यापक वृंद, रासेयोचे सर्व विद्यार्थी या स्वच्छता अभियान कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दिनांक ०१/१०/२०१८ ला महाविद्यालयात 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले. या अभियानाप्रसंगी महाविद्यालयातील प्रशासकीय इमारतीपासून तर वर्गखोल्यांपर्यंतच्या संपूर्ण परिसराची स्वच्छता करण्यात आली. या अभियानात रा. से. यो. चे १५० स्वयंसेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

दिनांक ०२/१०/२०१८ ला स्थानिक भिवापूर महाविद्यालयात **'जागतिक अहिंसा दिनानिमित्त'** रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात केली. भिवापूर महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या जागतिक अहिंसा दिन दिंडीत महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. या दिंडीत रासेयोच्या विद्यार्थ्यांनी गावातील चौका-चौकात निरक्षरतेवर तसेच स्वच्छतेवर, पर्यावरण, दारूबंदी, प्लॅस्टीक निर्मुलन यावर आधारित पथनाट्य सादर केलीत. तसेच 'झाडे लावा झाडे जगवा',' आम्ही नारी सहन करणार नाही लाचारी'. 'व्यसनाची नशा जिवनाची दुर्दशा' अशा विविध घोषवाक्यांनी गावात जनजागरण करण्यात आले. दिंडीचा समारोप महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आला. युवावेध सप्ताह यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच रा से यो च्या स्वंयसेवकानी अथक परीश्रम घेतले.

**'स्वच्छता दिंडी'**

दिनांक २८/१२/२०१८ ला महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभाग व नगरपंचायत भिवापूर यांच्या माध्यमातुन 'स्वच्छता दिंडी' चे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता दिंडी भिवापूर शहरातुन काढण्यात आली. या स्वच्छता दिंडीत महाविद्यालयाच्या रा.से.यो चे विद्यार्थी व नगरपंचायत पदाधीकारी,कर्मचारी व स्वयंसेवी संस्थाचे कार्यकर्ते दिंडीत सहभागी झाले. या स्वच्छता दिंडी दरम्यान चौकाचौकात पथनाट्य व लोकनृत्याचे सादरीकरण करून स्वच्छतेचा जागर करण्यात आला.

## 'स्वच्छ - स्वस्थ भारताकरिता युवाशक्ती' विशेष वार्षिक शिबीर
## दत्तक ग्राम - अड्याळ (पुनर्वसन)

'स्वच्छ भारत- स्वस्थ भारत' या घोषवाक्यावर आधारित महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे महाविद्यालयीनस्तरीय सत्र २०१८-२०१९ चे विशेष वार्षिक शिबीर दिनांक २१/०१/२०१९ ते २७/०१/२०१९ या कालावधीत अड्याळ (पुनर्वसन) या दत्तक ग्रामी संपन्न झाले. या सात दिवसीय विशेष वार्षिक शिबिराची पूर्वतयारी दिनांक २१/०१/२०१९ पासून करण्यात आली. याच दिवशी महाविद्यालयाचे रा.से.यो. चे स्वंयसेवक हे शिबीरस्थळी उपस्थित झाले. शिबिरात एकूण ७५ स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी शिबिरातील विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करण्यात आले. व शिबिराच्या पुढील कार्यक्रमाचेही नियोजन करण्यात आले. शिबिर प्रमुख प्रा. डॉ. विजय दिघोरे व प्रा. डॉ. अनिता महावादीवार यांच्या नेतृत्वात व सहकारी प्राध्यापक यांच्या सहकार्याने शिबीर कालावधीत अनेक समाजाभिमुक मार्गदर्शन कार्यक्रम व स्वच्छता अभियानावर भर देऊन ग्राम स्वच्छतेवर विशेष अभियान राबविण्यात आले.

दिनांक २१.०१.२०१९ ला अड्याळ (पुनर्वसन) या दत्तक ग्रामी पोचल्यानंतर स्वयंसेवकांनी आवश्यक तेवढे शिबीर स्थळी श्रमदान केले. सायंकाळी प्रार्थनेनंतर स्वयंसेवकांचे एकूण पाच गट तयार करण्यात आले. गट पाडण्यात आल्यानंतर प्रत्येक गटांना वेगवेगळी पुढील दिवसांची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच शिबिराच्या यशस्वीतेबाबतच्या अनेक महत्वाच्या सूचना देण्यात आल्या.


दिनांक २२.०१.२०१९ ला सकाळी ६.०० वाजता प्रार्थना, योगा व प्राणायाम आटोपून सकाळी ७.१५ वाजता जनजागरण दिंडी काढण्यात आली. या दिंडीच्या माध्यमातून अड्याळ येथील जनतेला **'पर्यावरण', 'व्यसनमुक्ती', 'बेटी बचावो बेटी पढावो'** तसेच **स्वच्छ व स्वस्थ भारताविषयीच्या** विविध घोषणा देवून जनतेमध्ये जनजागृती करण्यात आली. जनजागरण दिंडीनंतर दिनांक २२.०१.२०१९ ला महाविद्यालयीन विशेष शिबिराचा उद्घाटन सोहळा असल्याने विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून जि. प. उच्च प्रा. शाळा, अड्याळ येथील परिसर स्वच्छ केला. नियोजित वेळेनुसार रा.से. यो.चे स्वयंसेवक उद्घाटन सोहळ्याच्या कामाला लागले. शिबिराचे उद्घाटन प्रा. डॉ. **नथ्थुजी गिरडे** (माजी एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी, ( कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी ) यांच्या हस्ते पार पडले. त्यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय? या अर्थापासून तर राष्ट्रीय सेवा योजनेत व्यक्तिमत्व विकासासाठी कशी संधी मिळते असे सांगून ते जीवन शिक्षणाचे महत्वाचे साधन आहे यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज व विशेष अतिथी म्हणून श्रीमती किरण नागरीकर (नगराध्यक्ष, नगरपंचायत, भिवापूर), प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमती मंगला विजय तांबे (सरपंच, ग्रामपंचायत, अड्याळ), मा. श्री. दिलीपजी गुप्ता (सामाजिक कार्यकर्ता, भिवापूर), मा. श्री. लिलाधर चौधरी (अध्यक्ष, शाळा समिती अड्याळ) मा. श्री. वसंतजी गायकवाड (उपसरपंच, ग्रामपंचायत, अड्याळ), मा. श्री. पी. व्ही. वरघे (मुख्याध्यापक, जि. प. उच्च प्रा. शाळा, अड्याळ), मा. विलासजी कुडेगावे तसेच महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. सुनिल शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम पाहुण्याच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनी आपआपले स्थान ग्रहण केल्यानंतर विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. विद्यापीठ गीतानंतर अतिथींचे स्वागत, स्वागत गीताने करण्यात आले. यानंतर महाविद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन समारंभपूर्वक स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय दिघोरे यांनी केले. संचालन सह.कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिता महावादीवार यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. राजेश बहुरूपी यांनी मानले. या दिवशी रात्री रा.से.यो. च्या स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी दिली.

दिनांक १८ जे २० मार्च २०१९ या कालावधीमध्ये कौशल्य विकास शिबीराचे आयोजन, गुरूनानक सभागृह, अंबाझरी बायपास , अमरावती रोड, नागपूर येथे केले होते या शिबीरामध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक १) राकेश राजु फोपसे बि. कॉम. भाग १ २) श्री. विपीन भोजराज गजभिये बी. कॉम भाग १ ३) श्री. स्वप्नील यशवंत गायमुखे बि. कॉम. भाग १ यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला.


भिवापूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाची वाढती यशस्वीता ही उल्लेखनीय बाब समजावी लागेल. याचे सर्व श्रेय संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. भाऊसाहेब मुळक, संस्थेचे अध्यक्षा श्रीमती सुमनमाला मुळक, संस्थेचे सचिव मा. माजी नामदार राजेंद्रजी मुळक (राज्यमंत्री), संस्थेच्या मॅनिजींग डायरेक्टर श्रीमती प्रेरणाताई मुळक, व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज, प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. च्या सर्व लोकांना जाते. या सर्वांनी ज्या आत्मियतेने सहकार्य केले त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. त्याचबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जी धडपड दाखविली आणि कार्यक्रम यशस्वी केले त्याबद्दल मी सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे.

**कार्यक्रम अधिकारी**
**प्रा. डॉ. विजय दिघोरे**












donation

# क्षणचित्रे



अर्थशास्त्र अधिवेशन प्रसंगी स्वागतपर मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज



इतिहास अभ्यासमंडळाच्या उद्घाटन प्रसंगी कु. नेहा सावरकर हिचा सत्कार करतांना डॉ. शामराव कोरेटी



मराठी अभ्यासमंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुकर नंदनवार



अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी वाचनालयातर्फे ग्रंथ प्रदर्शनीचे अवलोकन करतांना मान्यवर



नविन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभा प्रसंगी मार्गदर्शन करतांना आयोजक डॉ. सुनील शिंदे



रस्ता सुरक्षा अभियान 'सडक सुरक्षा जीवन रक्षा' अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना पोलिस स्टेशनचे मा. ठाणेदार

# क्षणचित्रे













